रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक २९४
www.ramprahar.com

सोमवार, १२ मे २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## राजकोट किल्ल्यावरील शिवरायांच्या पुतळ्याचे अनावरण



**मालवण :** कोकणातील मालवणमधील राजकोट येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या भव्य दिव्य पुतळ्याचे अनावरण रविवारी (दि.११) मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, माजी केंद्रीय मंत्री नारायण राणे, मंत्री नितेश राणे यांच्यासह प्रमुख नेत्यांच्या उपस्थितीत उद्घाटन सोहळा झाला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राजकोट येथील पुतळा कोसळल्याच्या घटनेचा उल्लेख करून या पुतळ्याची उभारणी करणार असा निर्धार आम्ही केला होता असे वचन आम्ही महाराष्ट्राला दिले होते. त्यानंतर ९१ फुटांचा हा पुतळा तयार करण्यात आला आहे. किमान १०० वर्षे या पुतळ्याला काही होणार नाही, असे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.


### अंतरंग

राज्यात सुरू होणार आपले सरकार सेवा केंद्र/२

राजनाला कालवा परिसरातील शेतीचे मोठे नुकसान/५

आयपीएलच्या अंतिम सामन्याची तारीख ठरली!/८


# पनवेल-उरणमध्ये शेकापला हादरा!

## ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांचा समर्थकांसह भाजपमध्ये प्रवेश




(अधिक छायाचित्रे पान ३ वर..)

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शेकापचे ज्येष्ठ नेते तथा पनवेल नगर परिषदेचे माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, महानगरपालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांच्यासह पदाधिकारी, लोकप्रतिनिधींनी भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश करत पनवेल, उरण, खालापूरसह रायगडमध्ये राजकीय भूकंप केला. लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी यांच्या पुढाकारातून हा प्रवेश झाला. उलवे नोडमधील रामशेठ ठाकूर मैदानावर हा पक्षप्रवेश सोहळा भाजपचे प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण, माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांच्या हस्ते व लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत मोठ्या जल्लोषात झाला. पक्षप्रवेशाची भली मोठी रांग या वेळी लागली होती. त्यामुळे शेकापला मोठा हादरा बसला आहे.

शेकापचे नेते जे.एम. म्हात्रे, प्रितम म्हात्रे यांच्यासोबत शेकाप जिल्हा चिटणीस व माजी नगरसेवक गणेश कडू, उपाध्यक्ष रविशेठ पाटील, वहाळचे माजी सरपंच व ज्येष्ठ नेते पांडुमामा घरत, ज्येष्ठ नेते हरचंदसिंग सग्गू, ज्येष्ठ नेते रघुशेठ घरत, मनुशेठ कांडपिळे, तालुका सहचिटणीस जितेंद्र म्हात्रे, पुरोगामी युवक संघटनेचे उरण तालुका अध्यक्ष रमाकांत म्हात्रे, लाल ब्रिगेड तालुकाध्यक्ष रमाकांत पाटील, प्रकाश जितेकर, माजी नगरसेविका अनुराधा ठोकळ, सुरेखा मोहोकर, प्रिती जॉर्ज–म्हात्रे, अरुणा दाभणे, सारिका भगत, पुष्पलता मढवी, श्वेता बहिरा, कुसुम पाटील, रेणुका मोहोकर, प्रार्थना वाघे, मंजुळा कातकरी, माजी नगरसेवक रवींद्र भगत, सुनील बहिरा, गणेश पाटील, डी.पी. म्हात्रे, आकाश ठोकळ, माजी जिल्हा परिषद सदस्य राजूशेठ पाटील, **(पान २ वर..)**



*देशाचे कणखर नेतृत्व पंतप्रधान नरेंद्र मोदी देशाची, तर राज्याचे कुशल नेतृत्व मुख्यमंत्री फडणवीस राज्याची ताकद आहे. त्यांच्या नेतृत्वात देश आणि राज्य पुढे यशस्वी मार्गक्रमण करत आहे. तळागाळातील कार्यकर्ते, समाज बांधवांच्या समस्याचे निराकरण करण्याची जबाबदारी त्यांनी घेतली आहे. सन २०४७ला आपला देश महासत्ता होणार आहे. त्यात महाराष्ट्राचा वाटा असला पाहिजे यासाठी सन २०२८च्या अगोदर तीन ट्रिलियनची अर्थव्यवस्था करण्याचे उद्दिष्ट देवेंद्रजींनी ठेवले आहे. त्यामुळे महाराष्ट्र आता कोणत्याही क्षेत्रात कमी पडणार नाही. जे.एम. म्हात्रे, प्रितम म्हात्रे यांनी त्यांच्या असंख्य पदाधिकारी कार्यकर्त्यांसह प्रवेश केला. भाजप हा कार्यकर्त्यांचा पक्ष आहे. अशा या पक्षात तुम्ही आज सहभागी झाला आहात याचा निश्चित तुम्हाला अभिमान वाटेल.*

**–रवींद्र चव्हाण,** कार्यकारी अध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश भाजप

*२००४ साली शेकापतून बाहेर पडलो त्याची आठवण देणारा हा पक्षप्रवेश आहे. जे.एम. म्हात्रे, प्रितम म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली हजारो कार्यकर्ते भाजपमध्ये सहभागी झाले याचा मला खूप आनंद आहे. रवींद्र चव्हाण यांनी पाठीवर हात ठेवला की, शंभर टक्के विजय होतो. जे.एम. म्हात्रे माझे खास मित्र आहेत. राजकारणाच्या दृष्टिकोनातून आमची ताटातूट झाली होती. आम्ही व्यावसायिक म्हणून काम करत होतो. या प्रवेशामुळे मोठ्या प्रमाणात ताकद वाढली आहे. काम करणार त्याला संधी मिळणार आणि या ठिकाणी जुना नवा असा कोणताही भेदभाव नाही. त्यामुळे आगामी निवडणुका जिंकायला आणि लोकांची सेवा करण्यासाठी कायम सज्ज राहूया.*

**–लोकनेते रामशेठ ठाकूर,** माजी खासदार

*स्व.भगतसाहेबांच्या पुण्यभूमीत आपण वाढलो आहोत. शेकापने मला पदांवर संधी दिली आणि मी पण पक्षवाढीसाठी तन, मन, धनाने काम केले. महाविकास आघाडीने शेकापवर अन्याय केला. त्यामुळे महाविकास आघाडीतून बाहेर पडून शेकाप अबाधित ठेवत कार्यकर्त्यांना बळ देऊ, अशी पक्षश्रेष्ठींना विनंती केली, मात्र त्यांच्याकडून साफ इन्कार आला. ज्या महाविकास आघाडीने आपल्याला संपवण्याचा घाट केला आहे. त्यांच्याबरोबर राहून कार्यकर्त्यांचेही भले होणार नाही. त्यामुळे मुख्य प्रवाहात काम करण्याचा निर्णय घेतला आणि आज भाजपमध्ये दाखल झालो. शेकापत ज्याप्रमाणे काम केले, त्याप्रमाणे भाजपत आम्ही सक्रियपणे काम करणार असून हे सर्व रामशेठ ठाकूर यांच्यामुळे शक्य झाले.*

**–उद्योजक जे.एम. म्हात्रे,** माजी नगराध्यक्ष, पनवेल नगर परिषद

# पाकिस्तानचा खेळ आता खल्लास!
## हल्ला केल्यास भारत देणार चोख प्रत्युत्तर

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारत आणि पाकिस्तान यांच्यात शस्त्रसंधी झाली आहे. या कराराअंतर्गत दोन्ही देशांनी एकमेकांवर हल्ले न करण्याचं ठरवलं आहे. दरम्यान, भारत–पाकिस्तानमध्ये सध्या तणावाची स्थिती असताना भारताच्या तिन्ही सैन्यदलांच्या प्रमुखांनी पत्रकार परिषद घेऊन गेल्या काही दिवसांत नेमकं काय–काय घडलं? याबाबत सविस्तर माहिती दिली आहे. विशेष म्हणजे आता भारताने आणखी कठोर भूमिका घेतली असून भारतीय आर्मीला प्रत्युत्तर देण्यास खुली सूट देण्यात आली आहे.

भारताच्या तिन्ही सैन्यदलाच्या पत्रकार परिषदेत लेफ्टनंट जनरल राजीव घई यांनी भारतीय लष्कराच्या भूमिकेविषयी सविस्तर माहिती दिली. आज मी पाकिस्तानच्या माझ्या समकक्ष अधिकाऱ्याला संदेश दिला आहे. पाकिस्तानकडून शस्त्रसंधीचे होत असलेल्या उल्लंघनाबाबत आम्ही त्यांचे लक्ष वेधले आहे. १० मे रोजी झालेल्या कराराचे उल्लंघन होत असल्याचेही आम्ही त्यांना सांगितले, अशी माहिती राजीव घई यांनी दिली.

लष्कराच्या प्रमुखांनी (चिफ ऑफ आर्मी स्टाफ) आज एक आढावा बैठक घेतली आहे. या बैठकीत सुरक्षेचा आढवा घेण्यात आला. तसेच पाकिस्तानकडून शस्त्रसंधीचे कोणत्याही पद्धतीने उल्लंघन झाल्यास लष्कर प्रमुखांनी कमांडर्सना प्रत्युत्तर देण्यास पूर्णपणे सूट दिलेली आहे, असेही राजीव घई यांनी सांगितले.

दरम्यान, पत्रकार परिषदेच्या शेवटी राजीव घई शेवटी पाकिस्तानसोबतच्या तणावात मृत्युमुखी पडलेल्या भारतीय नागरिकांप्रती तसेच शहीद झालेल्या जवानांप्रती संवेदना व्यक्त केल्या. त्यांचा त्याग हा कायम लक्षात ठेवला जाईल. भारताच्या अखंडतेला, नागरिकांना धोका पोहोचवला जात असेल तर आम्ही चोख प्रत्युत्तर देऊ, असेही राजीव घई यांनी सांगितले.

हवाई दलाचे महासंचालक एअर ऑपरेशन्स एअर मार्शल अवधेश कुमार भारती यांनी सांगितलं की, परिस्थिती सध्या फार कठीण आहे, आम्हाला ही पत्रकार परिषद घ्यायची नव्हती. परंतु ती घेणं आवश्यक होती. भारतीय हवाई दलाने मुरीदके आणि बहावलपूर सारख्या दहशतवादी अड्ड्यांवर हल्ला केला. ही दोन्ही ठिकाणं आंतरराष्ट्रीय सीमेच्या आत होती, म्हणून त्यांची निवड करणं धोरणात्मकदृष्ट्या महत्त्वाचं होतं. अचूक हल्ल्यांसाठी हवाई दलाने सॅटेलाईट आणि गुप्तचर यंत्रणेच्या माहितीच्या आधारे अचूक शस्त्रास्त्रांचा वापर केला.



### १००हून अधिक दहशतवादी ठार

डीजीएमओ लेफ्टनंट जनरल राजीव घई यांनी सांगितले की, ९ दहशतवादी केंद्रांवर केलेल्या हल्ल्यांमध्ये १००हून अधिक दहशतवादी ठार झाले, ज्यात आयसी ८१४ च्या अपहरणात आणि पुलवामा बॉम्बस्फोटात सहभागी असलेले युसूफ अझहर, अब्दुल मलिक रौफ आणि मुदासिर अहमद सारखे दहशतवादीही मारले गेले. त्यानंतर लगेचच पाकिस्तानने नियंत्रण रेषेचे उल्लंघन केले आणि नागरी वस्ती असलेल्या गावांवर आणि गुरुद्वारांसारख्या धार्मिक स्थळांवर हल्ला केला. ज्यामुळे दुर्दैवाने जीवितहानी झाली. भारतीय हवाई दलाने यापैकी काही छावण्यांवर हल्ला करून या हल्ल्यांमध्ये मोठी भूमिका बजावली.

## निवडक

### काँग्रेसच्या नेत्याकडून मोदींच्या युद्धनीतीचे कौतुक

**नवी दिल्ली :** भारत आणि पाकिस्तानदरम्यान पहलगाम हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानवर एअर स्ट्राईक केली. या मोहिमेला ऑपरेशन सिंदूर नाव देण्यात आले होते. भारताने केलेल्या या कारवाईचे आणि त्यानंतर अवलंबलेल्या नीतीचे काँग्रेस नेता आणि माजी गृहमंत्री पी. चिदंबरम यांनी कौतूक केले आहे. एका प्रसिद्ध कॉलममध्ये चिदंबरम यांनी नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भारताने केलेली कारवाई ही 'बुद्धिमत्तापूर्ण आणि संतुलित' असल्याचे म्हटले आहे.

### गडचिरोलीतील धान घोटाळा; आणखी पाच जणांना अटक

**गडचिरोली :** जिल्ह्यात चर्चेत असलेल्या धान घोटाळ्याप्रकरणी देऊळगाव खरेदी केंद्राच्या पाच संचालकांना कुरखेडा पोलिसांनी रविवारी अटक केली आहे. धान घोटाळा प्रकरणी खरेदी केंद्राच्या अध्यक्ष सचिवासह १७ जणांवर पोलिसांनी गुन्हा दाखल केला होता. त्यातील दोघांना यापूर्वीच अटक झाली असून आता आणखी पाच जणांना अटक केल्याने अटकेतील आरोपींची संख्या सात झाली आहे.

# महाराष्ट्रातील सर्वात मोठा सौरऊर्जा प्रकल्प पुण्यात
## १४ तालुक्यांमध्ये १३१ वीज उपकेंद्र

**पुणे : प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील सर्वात मोठा सौरऊर्जा प्रकल्प पुण्यात उभारण्यात आला आहे. पुणे जिल्ह्यात तीन हजार एकरावर सौर ऊर्जा प्रकल्प उभारला जाणार आहे. यामुळे महाराष्ट्रात सौरऊर्जा प्रकल्पांना चालना मिळणार आहे. संपूर्ण महाराष्ट्राला याचा फायदा होणार आहे.



पुणे जिल्ह्यांतील १४ तालुक्यांमध्ये १३१ वीज उपकेंद्र उभारले जाणार आहेत. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेला जिल्हा प्रशासनाने तीन हजार एकर जमीन महावितरणच्या ताब्यात दिली आहे. १४ तालुक्यांमध्ये १३१ वीज उपकेंद्राचे प्रस्ताव मान्य करण्यात आले आहेत. मुख्यमंत्री सौर कृषी योजनेद्वारे जिल्ह्यात तीन हजार एकर सरकारी जागेवर सौर ऊर्जा प्रकल्प उभे राहणार आहेत.

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अर्थात पीएमआरडी कडून हिंजवडी शिक्रापूर खडकवासला, भुगाव ते तामिनी घाट, कोरेगाव भीमा अशा विविध औद्योगिक पर्यटन आणि धार्मिक स्थळांची कनेक्टिव्हिटी वाढवण्यासाठी २८९ किलोमीटरचे रस्ते एकमेकांना जोडले जाणार आहेत. या कामासाठी सल्लागार नेमण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आली आहे. या प्रक्रियेमध्ये तब्बल ५१ ठिकाणचे रस्ते बनवले जाणार असून त्यासाठी दहा हजार १७१ कोटी ३७ लाख रुपयांचा खर्च अपेक्षित आहे.





**पनवेल : पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात सुबोध पाटील हे जखमी झाले होते. शनिवारी कामोठे येथील त्यांच्या निवासस्थानी भाजप महाराष्ट्र प्रदेशचे कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी पाटील यांची भेट घेतली तसेच त्यांच्या तब्येतीची विचारपूस केली. या वेळी पनवेल विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत ठाकूर, विधान परिषदेचे आमदार विक्रांत पाटील, भाजप कामोठे मंडळ अध्यक्ष विकास घरत, रवींद्र जोशी, हॅप्पी सिंग, माजी नगरसेवक विजय चिपळेकर आदी उपस्थित होते.**

# योगासनात महाराष्ट्राचा दुहेरी धमाका!
## दोन्ही गटात सुवर्ण अन् रौप्यपदक



**गया (बिहार): वृत्तसंस्था**

महाराष्ट्राच्या खेळाडूंनी ७व्या खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेतील योगासन स्पर्धेत रविवारी (दि.११) धडाकेबाज सुरूवात केली. रिदमिक योगासन पेअरमध्ये महाराष्ट्राने मुलांच्या आणि मुलींच्या गटात सुवर्ण अन् रौप्यपदके जिंकून निर्विवात वर्चस्व गाजविले. महाराष्ट्राने पहिल्याच दिवशी चार पदके जिंकून आपल्या लौकिकास साजेशी कामगिरी केली.

मुलांच्या रिदमिक योगासन पेअर स्पर्धेत रोहन तायडे–अंश मयेकर आणि प्रणव साहू–अर्यन खरात या महाराष्ट्रीयन जोड्यांनी अनुक्रमे सुवर्ण व रौप्यपदक जिंकले. सुवर्णपदक विजेत्या रोहन–अंश जोडीने १२९.५० गुणांची, तर रौप्यदपक विजेत्या प्रणव–अर्यन जोडीने १२९.२० गुणांची कमाई केली. सरांश कुमार व अभिषेक कुमार या बिहारच्या जोडीने १२७.३७ गुणांसह कांस्यपदक जिंकले. मुलींच्या रिदमिक योगासन पेअर स्पर्धेत रुद्राक्षी भावे व प्रांजळ व्हान्रा या महाराष्ट्राच्या जोडीने १३१.१९ गुणांसह सुवर्णपदकावर मोहर उमटवली. तृप्ती डोंगरे व देवांशी वाकले या जोडीने १३०.४४ गुणांसह रौप्यपदक जिंकले. स्पृहा कश्यप व भाबना बोरा या आसामच्या जोडीने १२७.२६ गुणांसह कांस्यपदकाला गवसणी घातली.

महाराष्ट्राला दोन सुवर्ण आणि दोन रौप्यपदके जिंकून देणारे खेळाडू हे संगमनेर येथील धृव ग्लोबल स्कूलचे खेळाडू आहेत. मंगेश खोपकर, विष्णू चक्रवर्ती, प्रवीण पाटील व अमृता चिनकर हे त्यांचे प्रशिक्षक होत. खेलो इंडिया स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर संगमनेरमध्येच या खेळाडूंचे ८ दिवशीय सराव शिबिज आयोजित करण्यात आले होते.

## पाषाणे डॅममधील मृतदेह सापडला

**नेरळ : प्रतिनिधी**

पाषाणे डॅममध्ये बुडालेल्या तरुणाचा दुसऱ्या दिवशी रविवारी (दि.११) मृतदेह पाण्यातून बाहेर काढण्यात आला आहे. तरुणाचा पाण्यात गुदमरून मृत्यू झाला. खोपोली येथील अपघातग्रस्त सामाजिक टीमने तरुणाचा मृतदेह पाण्यातून शोधून बाहेर काढला.

मयत तरुण अजय रावत हा वाहन वाहतूक व्यवसाय करीत असून तो आपल्या मित्रांना सोबत घेवून आपल्या वाहनाने वांगणी येथे आला होता. या घटने बाबत सार्विकडे हळहळ व्यक्त होत असून गेल्या आठवड्यात ही दुसरी घटना घडली आहे. घटनेचा अधिक तपास नेरळ पोलीस ठाण्याचे हवालदार लोखंडे करीत आहेत.

**(सविस्तर पान २ वर..)**

# पन्हाळगडावर पावसाची जोरदार हजेरी; मुख्य रस्त्यावर दोन शिळा कोसळल्या



**कोल्हापूर : प्रतिनिधी**

उष्म्याचा कडेलोट झाल्यानंतर रविवारी (दि.११) सायंकाळी विजांच्या लखलखाट आणि वादळी वाऱ्यासह एक तास पाऊसाची जोरदार हजेरी लावत सलग एक तास पाऊस पन्हाळगडावर पडल्याने नागरीकांना उष्म्या पासून थोडा दिलासा मिळाला. पन्हाळ्यावर येणाऱ्या रस्त्यावर पहिल्याच पावसात मोठ्या दोन शिळा कोसळल्याने काही वेळ वाहतूक बंद करण्यात आली होती. पावसाची एक तासात २२ मि.मी. नोंद झाली.

कोल्हापूर जिल्ह्याचे थंड हवेचे ठिकाण म्हणून प्रसिद्ध असलेल्या पन्हाळ्यावर गेले काही दिवस झाले नागरिक उष्म्याने हैराण झाले होते. उष्म्याच्या त्रासाने गडावर पर्यटकांनी पाठ फिरवली होती सर्वच जण उन्हाच्या झळांमुळे हैराण झाले होते रविवारी सकाळी पासुनच वातावरणात बदल झाला होता पाऊसाची सर्व जण प्रतीक्षा करत होते अचानक सायंकाळी पाच वाजता सोसाट्याच्या वादळी वाऱ्या बरोबरच विजांच्या कडकडाटात एक तास पावसाने जोरदार हजेरी लावत संपूर्ण शहरात पावसाने पाणी–पाणी करून टाकले.

दरम्यान दुपारपासूनच वीज मंडळाने विद्युत पुरवठा खंडित केला होता पडलेल्या जोरदार पावसामुळे नागरीकांना उष्म्यात थोडा दिलासा मिळाला असला तरी ढगाळ वातावरण कायम राहिल्याने पुन्हा रात्री पाऊस पडण्याची शक्यता दाट होती पाऊस व विजेने झाडांची पडझड झाली नसली तरी मुख्य रस्त्यावर मोठ्या दोन शिळा कोसळल्यामुळे काही वेळ वाहतूक बंद करण्यात आली होती.

## 'लाडकी बहीण'च्या नावाने फसवणूक

**मुंबई : प्रतिनिधी**

'लाडकी बहीण' योजनेच्या नावाखाली मुंबईमध्ये अडीच हजार जणांची फसवणूक झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणामध्ये जुहू पोलिसांनी तीन आरोपींना अटक केली आहे.

'लाडकी बहीण' योजनेंतर्गत पैसे मिळवून देण्याच्या नावाखाली खाती उघडून ती खाती सायबर गुन्हेगारांना विकणाऱ्या टोळीचा पर्दाफाश झाला आहे. या घोटाळेबाजांनी मुंबईमधील वेगवेगळ्या भागातील अडीच हजार जणांना गंडा घातला आहे. विशेष म्हणजे गुजरातमधून २५०० मुंबईकरांना हा गंडा घालण्यात आला आहे.

जुहू पोलिसांनी केलेल्या तपासामध्ये काही बँकांनी व्हेरिफिकेशन आणि इतर पात्रता तपासून पाहिली नाही. खास करुन चाळीत राहणाऱ्या खात्यांचे व्हेरिफिकेशन झालं नाही. पोलिसांनी आतापर्यंत १०० हून अधिक खाती बंद केली आहेत.

# राज्यातील पालिकांतून सुरू होणार आपले सरकार सेवा केंद्र

## इतर विभागांच्या ऑनलाईन सेवाही मनपा केंद्रातून मिळणार

**मुंबई : प्रतिनिधी**

महापालिका, नगरपरिषद, नगरपंचायतींमधून आता 'आपले सरकार सेवा केंद्र' सुरू होणार आहेत. राज्य सरकारच्या नगर विकास विभागाने या संदर्भातील आदेश जारी केला आहे.

पालिकांमधील आपले सरकार सेवा केंद्रातून राज्य शासनाच्या विविध विभागांनी अधिसूचित केलेल्या सर्व ऑनलाइन सेवांचे ऑनलाईन अर्ज स्वीकारले जातील व त्या संबंधातील सेवा पुरवल्या जातील.

आपले सरकार सेवा केंद्र यापूर्वी ग्रामपंचायती व खासगी व्यक्तींमार्फत चालवली जात होती. या केंद्रांमार्फत राज्य सरकारच्या विविध विभागांच्या अधिसूचित केलेल्या एकूण ७० सेवा ऑनलाईन पध्दतीने दिल्या जातात. आता या सर्व सेवा मनपा, परिषदा, पंचायतीमार्फतही दिल्या जाणार आहेत.

राज्यातील सर्व महापालिकांचे आयुक्त तथा प्रशासक, नगरपरिषद व नगरपंचायतींचे मुख्याधिकारी यांनी त्यांच्या अखत्यारीत सुरू करावयाच्या आपले सरकार सेवा केंद्राची यादी जिल्हाधिकाऱ्यांना सादर करून जिल्ह्याच्या 'एनआयसी' केंद्राकडून मनपा, नगर परिषद, नगरपंचायतीच्या नावाने आपले सरकार सेवा केंद्राचे 'युजर आयडी' प्राप्त करून घ्यायचे आहेत.

त्याचप्रमाणे आपले सरकार पोर्टल वरून देण्यात येणाऱ्या सर्व सेवांकरता महाआयटी महामंडळाकडून 'युजर आयडी' प्राप्त करून घेण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत महामंडळाकडे प्रस्ताव पाठवायचे आहेत.

महाआयटी महामंडळाने ऑनलाइन अर्जाचे शुल्क स्वीकारण्याकरता संबंधित मनपा, नगर परिषदा, नगरपंचायतीच्या केंद्रांना तत्काळ 'वॉलेट' सुविधा उपलब्ध करून देण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

या केंद्रामार्फत राज्य सरकारच्या सर्वच विभागांच्या ऑनलाइन सेवांचे अर्ज स्वीकारले जातील व संबंधित दाखल्यांची संगणकीय प्रत देण्याची कार्यवाही मनपा, नगरपरिषद नगरपंचायतीमधील केंद्रातून होणार आहे. शहरातील नागरिकांना सर्वसामावेशक सेवा पुरवणारी केंद्र उपलब्ध होण्यासाठी राज्यसेवा हक्क आयोगाच्या मुख्य आयुक्तांनी तसेच उपमुख्यमंत्र्यांनीही मनपा, परिषद नगरपंचायतीमार्फत केंद्र सुरू करण्याचे सूचित केले होते. त्यानुसार हा आदेश काढण्यात आला आहे.

# पाषाणे डॅममध्ये बुडालेल्या तरुणाचा मृतदेह सापडला

**नेरळ, कर्जत : प्रतिनिधी**

पाषाणे डॅममध्ये बुडालेल्या तरुणाचा दुसऱ्या दिवशी रविवार ११ मे रोजी मृतदेह पाण्यातून बाहेर काढण्यात आला आहे. तरुणाचा पाण्यात गुदमरून मृत्यू झाला.खोपोली येथील अपघात ग्रस्त सामाजिक टीमने तरुणाचा मृतदेह पाण्यातून शोधून बाहेर काढला आहे.

नवी मुंबई दिघा गावातील पाच तरुण वांगणी पाषाणे येथील आपल्या मित्राकडे मौजमजा करण्यासाठी म्हणून १० मे रोजी आले होते. दरम्यान, पाषाणे डॅम येथे हे तरुण पोहण्यासाठी गेले असतां दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास चार तरुण पाण्यात बुडाले होते, मात्र यातील तिघांना वाचवण्यात सहकारी मित्राला यश आले तर अजय विष्णू रावत हा बेपत्ता होता.



नवी मुंबईतील दिघा गाव येथील शिवभवन बिल्डींग मधील राहणारे रोजकुमार सोनपाल छाजलाना,हरेंदर सोहन सिंग, दिपक रोजकुमार छाजलाना, आदित्य रोजकुमार छाजलाना आणि अजय रावत हे पाच तरुण वांगणी पाषाणे येथील हिमालय गार्डन येथे मित्राकडे फिरण्यासाठी आले होते. दरम्यान, गावाला लागून असणाऱ्या खडक वाडी येथील पाषाणे डॅम येथे हे पाच तरुण पोहण्यासाठी म्हणून गेले होते.यातील चार तरुण पाण्यात आनंद घेत होते तर ४९ वर्षीय रोजकुमार छाजलाना हा डॅमच्या काठावर उभा राहून आनंद घेत होता.

पाण्यात पोहत असणारे चार तरुण पाण्याच्या खोलीचा अंदाज न आल्याने पाण्यात बुडू लागले असताना यावेळी रोजकुमार याने पाण्यात उडी मारून तिघांना पाण्याबाहेर सुखरूप काढले, परंतु २६ वर्षीय अजय विष्णू रावत हा खोलवर पाण्यात बुडून बेपत्ता झाला होता.त्याचा उशिरा स्थानिक पोलीस ग्रामस्थांच्या मदतीने पाण्यात शोध घेत होते, परंतु अंधार झाल्याने अनेक अडचणी येत असल्याने शोधमोहीम थांबवण्यात आली होती.अखेर आज सकाळी नऊ वाजण्याच्या सुमारास खोपोली येथील अपघातग्रस्त सामाजिक टीमचे गुरुनाथ साठेलकर यांच्या टीमने बुडालेल्या तरुणाचा पाण्यात सोध घेवून मृतदेह बाहेर काढला.

## मांस विक्री परवाना प्राप्तीसाठी ऑनलाईन अर्ज करण्याची सुविधा

**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९, कलम ४५८ च्या तरतुदीनुसार नवी मुंबई महानगरपालिकेने तयार केलेल्या कत्तलखान्याचे नियमन संबंधीच्या उपविधी मधील तरतुदीनुसार कोणत्याही व्यक्तीस किंवा संस्थेस महानगरपालिकेच्या पूर्व परवानगीशिवाय महापालिका कार्यक्षेत्रात खाजगी कत्तलखाना उघडता येणार नाही किंवा कोणत्याही प्राण्याची मांस विक्री मानवी आहारासाठी करता येणार नाही.

महसूल व वन विभागाच्या दि.२३ एप्रिल २०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार अनधिकृत बांधकामास आळा घालण्यासाठी आणि अनधिकृत बांधकामास प्रतिबंध करण्यासाठी 'इमारत पूर्णत्व / भोगवटा प्रमाणपत्र' सादर केल्यानंतरच त्या इमारतींमध्ये व्यवसाय परवाना देण्याचे बंधनकारक केले आहे.

मांस विक्री व्यावसायिकांनी परवानाप्राप्तीसाठीनवी मुंबई महानगरपालिकेच्या ु.पाल.सीं. ळप या वेबसाईटवर 'नागरिक सेवा'सेक्शनमध्ये आरोग्य विभागाच्या सेक्शनलाआवश्यक कागदपत्रांसह भेट देउन ऑनलाईन अर्ज करावा.

## माथेरानमध्ये वन्य प्राण्यांसाठी प्रशासनाकडून उपाययोजना

**कर्जत : रामप्रहर वृत्त**

माथेरान या वन जमिनीवर वसलेल्या शहरात जंगल अधिकार प्रमाणात आहे. त्यामुळे ब्रिटिशांनी बनवलेल्या कायदे यांच्यात वन्य प्राणी आणि झाडे यांना महत्व देण्यात आले आहे. माथेरानचे जंगलात असलेल्या वन्य प्राणी यांना जंगलात मुक्त संचार करता यावा यासाठी कुठेही दगडी कुंपण घालण्यास बंद आहे, मात्र सेट व्हिला या बंगल्याला तब्बल आठ फूट उंचीचे दगडी कुंपण घालण्यात आले असल्याने पालिका प्रशासन आणि वन विभाग यावर करावी करीत नसल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.

माथेरान हे ब्रिटिशांनी वसवलेले पर्यटन स्थळ असून येथे थंडगार हवेचा आस्वाद घेण्यासाठी देश विदेशातून पर्यटक येतात. त्यात माथेरान हे तेथील घनदाट जंगल आणि वनसंपदा यामुळे प्रसिद्ध असून त्या जंगलात मोठ्या प्रमाणात प्राणी आणि पक्षी आहेत. त्यामुळे या ठिकाणचे जंगलात असलेल्या प्राण्यांनी मुक्त संचार करावा यासाठी ब्रिटिशांनी कायदे करून ठेवले आहेत. त्यात माथेरान प्लॉट आणि बाजार प्लॉट अशी भूखंडाची रचना केली असली तरी कोणत्याही लीज धारक जागा मालकाने आपल्या जागेला अकुंपण करू नये असे स्पष्ट निर्देश आहेत. त्यात माथेरान मधील जमीन हि लीज वर वापरण्यास दिलेली असल्याने या जमिनीचे मूळ मालक हे शासन असल्याने माथेरान मध्ये वन्य प्राण्यांना मुक्त संचार करण्यासाठी कोणत्याही जागेला कुंपण करू नये असे निर्देश आहेत.

जेमतेम दोन फूट उंचीचे आणि ते देखील स्थानिक पातळीवर मिळणाऱ्या दगडांचे कुंपण घालण्याच्या मुभा आहेत. मात्र आता माथेरान मध्ये सर्रास जांभा दगड आयात करून आणला जातो आणि त्या दगडाचे माध्यमातून बंगले धारक दगडी कुंपण सिमेंट बांधकाम करून करीत असल्याचे आढळून येत आहे. डम्पिंग ग्राउंड मंकी पॉईंट रस्त्यावर सेट व्हील बांगला असून या बंगल्याच्या मालकाने त्या ठिकाणी चक्क आठ फूट उंचीचे जांभा दगडाचे सिमेंट बांधकाम करून भिंत बांधली आहे. त्या भिंतीच्या आत काय आहे हे देखील बाहेरच्या व्यक्तीला दिसून येत नाही.असे असताना त्याबाबत माथेरान पालिका तसेच माथेरान वन विभाग यांच्याकडून कोणत्याही प्रकारची कार्यवाही होत नाही. सध्या हाच सेट व्हिला बंगला अन्य नावाने ओळखला जात असून अशा भिंतीवरवर शासन स्तरावरून कारवाई होणार आहे काय? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

## आनंदी मानवी जीवनासाठी भगवान गौतम बुद्धांचे तत्वज्ञान अंगिकारा

मानवाने खूप प्रगती केली. त्याने तंत्रज्ञान आणले, विविध शोध लावले. आता तंत्रज्ञानाचे पुढचे पाऊल हे कृत्रिम बुद्धिमत्ता असणार आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता हे मानवासाठी एक मोठे आव्हान ठरणार आहे. मानव अंतराळात गेला, क्रांती झाली. मानवाची भौतिक प्रगती खूप होत आहे. परंतु मानव मात्र दुःखीच आहे. तो समाधानी नाही. त्याची हाव काही थांबता थांबतच नाही आहे. परंतु त्याला समाधान व आनंद पाहिजे आहे. तो आनंद, समाधान हा भौतिक गोष्टीत शोधत आहे. तो मोठे आलिशान घर घेतो आहे पण त्याला सुख, समाधान, आनंद मिळत नाही आहे.

मानवाचा सुख, समाधान आणि आनंद राजवाडयात जातो. तो दूर जंगलात जातो, शांत ठिकाणी जातो. परंतु त्याला काही शांती मिळत नाही. माणूस जो पर्यंत आतून समाधानी होत नाही. तो पर्यंत तो दुःखीच राहणार आहे. माणसाची मुख्य समस्या ही त्याची स्वतः ची आहे. तो समाधान हे दुसऱ्यात बघतो त्याला हे माहित नाही की समोरच्याला तो दुरुस्त करू शकत नाही. त्याला स्वःताला तंदुरुस्त, मजबूत, समाधानी केले पाहिजे. म्हणून तर भगवान बुद्ध म्हणतात की, अत्त दिप भव! स्वतःच स्वतःचा मार्ग शोधा. आपण मात्र दुसऱ्यांच्या उणिवांकडे व दुसऱ्यात दोष असल्याचे बघत असतो. तो मात्र काही दुरुस्त होत नाही आणि आपण मात्र आपल्यात काही बदल घडवून आणत नाही.

भगवान बुद्धांनी इर्षा किंवा द्वेष या भावनांवर निमंत्रण ठेवण्याचे महत्व शिकवले आहे. त्यांच्या शिकवणीनुसार, इर्षा आणि द्वेष हे दुःखाचे मुख्य कारण आहेत आणि त्यातून दुःख निर्माण होते. भगवान गौतम बुद्धांनी लोकांना आंतरिक शांती आणि आनंदी जीवन जगण्यासाठी इच्छा आणि आसक्ती सोडून देण्याचा मोलाचा सल्ला दिला आहे.भगवान गौतम बुद्ध म्हणतात की, इर्षा आणि द्वेष हे आपल्या मनातील नकारात्मक भावना आहेत ज्यामुळे दुःख निर्माण होते. या इच्छा आणि आसक्ती सोडून दिल्यास, सुख आणि शांती प्राप्त होते.

सिद्धार्थ गौतम बुद्ध म्हणतात आपल्या मनाची आंतरिक स्थिती आनंदी किंवा दुःखी हे आपल्यावर अवलंबून असते. आपल्या विचारांवर नियंत्रण ठेवल्यास आपण आनंदी जीवन जगू शकतो.

बुद्धत्व म्हणजे काय तर दुःख आणि अज्ञानाच्या अवस्थेतून मुक्त होणे, जी ज्ञानाची एक अवस्था आहे. निर्वाण प्राप्त झाल्यावर व्यक्ती दुःख आणि दुःखाच्या चक्रातून मुक्त होतो. बुद्ध धम्म हे एक असे तत्वज्ञान आहे जे लोकांना दुःख आणि दुःखाच्या चक्रातून बाहेर काढण्यासाठी मार्ग दाखविते.पंचशील ही बौद्ध धम्मातील एक आचरण नियमावली आहे. सामान्यतः पाच तत्वांना पंचशील म्हणून संबोधले जाते. पंचशील हे पाच नियम आहेत, पाच गुण आहेत. बुद्धांनी सामान्य माणसाकरिता आपल्या शरीरावर नियंत्रण ठेवण्यासाठी या शाब्दिक कृती नियंत्रित करण्यासाठी, त्यापासून परावृत्त होण्यासाठी हे पाच पंचशील तत्वे सांगितले आहेत.

**– अरविंद मोरे**

## 'खेळाडूंना क्रीडा कौशल्याच्या बळावर वेगवेगळ्या क्षेत्रांत संधी मिळते'

**खोपोली : प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाकडून मिळणाऱ्या क्रीडा सुविधांचा फायदा तळागाळातल्या खेळाडूंना व्हावा आणि त्या माध्यमातून उद्या खेळाडूंना प्रत्येक क्षेत्रात चमकण्याची संधी मिळावी असा आशावाद व्यक्त करतांना बरेच वर्षांपासून बंद स्थितीत असलेल्या या क्रीडा संकुलाला नवीन झळाळी प्राप्त होईल, असे मनोगत व्यक्त करत अप्पर पोलिस अधीक्षक रायगड अभिजित शिवथारे यांनी प्रशिक्षणार्थींना शुभेच्छा दिल्या.

जिल्हा क्रीड़ाधिकारी कार्यालय रायगड यांच्या वतीने उन्हाळी क्रीड़ा कौशल्य व व्यक्तिमत्व विकास शिबिराचे आयोजन येथील भव्य क्रीडा संकुलात करण्यात आले आहे. या शिबाराच्या उद्घाटनानिमित्त रायगडचे अप्पर पोलिस अधीक्षक रायगड अभिजीत शिवथारे, रायगड जिल्हा परिषदेचे शिक्षण अधिकारी (माध्य) महारुद्र नाळे, यांच्या हस्ते झाले. या वेळी हेल्प फाउंडेशनचे गुरुनाथ साठेलकर, सामाजिक कार्यकर्ते रिकी अगरवाल हे देखील उपस्थित होते.

साधारण दीड महिना चालणाऱ्या या शिबिरात लगोरी सारख्या पारंपारिक खेळापासून आंतरराष्ट्रीय स्तरावरच्या नेमबाजी सारख्या विविध खेळ प्रकारांचे प्रशिक्षण तंत्रशुद्ध पद्धतीने देण्यात येणार आहे. साधारणता दीडशेपेक्षा अधिक प्रशिक्षणार्थींचा सहभाग या शिबिरात असणार आहे. यानिमित्ताने रायगड जिल्हा क्रीडा अधिकारी प्रकाश वाघ यांनी अशा शिबिरातून प्रशिक्षण घेतलेल्या प्रशिक्षणार्थींमधून उद्याचे राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरचे खेळाडू निर्माण व्हावेत याच उद्देशाने हे आयोजन असल्याचे आपल्या प्रस्ताविकात सांगितले.

हेल्प फाउंडेशनचे गुरुनाथ साठेलकर, सामाजिक कार्यकर्ते रिकी अगरवाल, पत्रकार धनजंय कवठेकर इत्यादी मान्यवर उपस्थित होते. प्रशिक्षक यतीराज पाटिल, तपस्वी गोंधळी, संदीप गुरव, देवीदास पाटिल, भरत गुरव, पुरुषोत्तम पिंगळे, संतोष जाधव, नागेश शिंदे, वीरेंद्र पवार, माधवी पवार, यांनी शिबिराच्या आयोजनात महत्त्वाची भूमिका बजावली.

## अमेरिकेतील पेस्टल जर्नल मासिकाच्या मुखपृष्ठावर कर्जतच्या पराग बोरसेंचे चित्र

**कर्जत : प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील ग्रामीण जीवनाचे दर्शन घडवणारी व्हायब्रन्सी ही कलाकृती अमेरिकेत प्रसिद्ध होणाऱ्या पेस्टल जर्नल मासिकाच्या मुखपृष्ठावर झळकली आहे.

भारतीय कलेसाठी अभिमानास्पद क्षण ठरवत, आंतरराष्ट्रीय स्तरावर ख्याती मिळवलेल्या कलाकार पराग बोरसे यांच्या 'व्हायब्रन्सी' या चित्राने अमेरिकेतील प्रसिद्ध आणि जगातील सर्वात मानाचे पेस्टल जर्नल या मासिकाच्या समर २०२५ आवृत्तीच्या मागील पृष्ठभागावर स्थान मिळवले आहे.




सॉफ्ट पेस्टल्स या माध्यमात कॅन्सन कागदावर साकारलेले हे चित्र एका महाराष्ट्रीयन मेंढपाळ शेतकऱ्याचे पोर्ट्रेट आहे. लाल रंगाच्या पार्श्वभूमीमुळे हे चित्र अत्यंत उठून दिसते. पराग बोरसे यांच्या मते, ही पार्श्वभूमी ग्रामीण भारताच्या उर्जेचे, ताकदीचे आणि आत्मसमानाचे प्रतीक आहे.

अमेरिकेतील अग्रगण्य पेस्टल साहित्य पुरवणारी कंपनी डाकोटा पेस्टलल्स यांनी या चित्राचा समावेश त्यांच्या संपूर्ण पानाच्या जाहिरातीत केला आहे. पेस्टल जर्नल सारख्या जागतिक कीर्तीच्या व्यासपीठावर ही कलाकृती झळकणे, हा पराग बोरसे यांच्यासाठी अत्यंत मानाचा क्षण आहे.

या यशाबाबत बोलताना पराग बोरसे म्हणाले, 'अशा क्षणांमुळे कलेबद्दलचा उत्साह अधिक वाढतो आणि पेस्टल आर्टच्या अमर्याद शक्यता शोधण्याची प्रेरणा मिळते. ही सन्मानाची बाब आहे.' सर जे.जे. स्कूल ऑफ अप्लाइड आर्ट, मुंबई येथून शिक्षण घेतलेल्या पराग बोरसे यांनी त्यांच्या प्रगल्भ शैलीमुळे आणि भारतीय जीवनाचे हुबेहूब चित्रण करणाऱ्या कलाकृतीमुळे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक सन्मान पटकावले आहेत. त्यांची ही आंतरराष्ट्रीय स्तरावरील यशस्वी वाटचाल भारतीय कलेचा जागतिक मंचावर वाढता प्रभाव अधोरेखित करते.

पान १ वरुन

## पनवेल-उरणमध्ये शेकापला हादरा!

जीवन म्हात्रे, माजी जिल्हा परिषद सदस्य पार्वती पाटील, पंचायत समितीच्या माजी सभापती निशा लक्ष्मण ठाकूर, माजी उपसभापती जगदीश पवार, सीमा घरत, भात गिरणी सहकारी संस्था उपसभापती राजेंद्र घरत, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती संतोष पाटील, करंजाडे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच रामेश्वर आंग्रे, वहाळचे माजी सरपंच बाळाराम पाटील, अरुण दापोलकर, सुनील पाटील, गणेश पाटील, गव्हाणच्या माजी सरपंच माया भोईर, सचिन घरत, एल.एल. पाटील, कोळखे ग्रामपंचायतीच्या सरपंच मिनल म्हात्रे, उषा अजित अडसुळे, कर्नाळा माजी सरपंच सुषमा पाटील, मानघर सरपंच राजेंद्र पाटील, वावेघर सरपंच गीतांजली गाताडे, तुराडे सरपंच रिया माळी, गुळसुंदे उपसरपंच अरुणा पाटील, माजी सरपंच आर.डी. पाटील, गुरुनाथ माळी, सदस्य काव्या जोशी, दीपाली जगताप, अभिजित पाटील यांच्यासह शेकापच्या हजारोंच्या संख्येने कार्यकर्ते, पदाधिकारी तसेच काँग्रेस, शिवसेना (ठाकरे गट), मनसेच्या कार्यकर्त्यांनी भाजपत जाहीर प्रवेश केला.

महाविकास आघाडीने शेकापचा घात केला. त्यामुळे रायगडमध्ये शेकापचे अस्तित्व रसातळाला गेले. अनेक पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी शेकापची साथ सोडत दुसऱ्या पक्षाची वाट धरली. त्यामुळे महाविकास आघाडीतून बाहेर पडून पक्ष वाढवायचा आग्रह जे.एम. म्हात्रे यांनी पक्षश्रेष्ठींकडे केला होता. गेल्या दीड महिन्यापासून त्यांचा पक्षाकडे मागणीचा रेटा राहिला. त्यांनी या संदर्भात मध्यंतरी पक्षाची बैठक घेतली होती. त्या वेळी महाविकास आघाडीतून बाहेर पडा, आपण पक्ष वाढवू, अशा स्पष्ट भाषेत सांगितले, मात्र तरीही त्यांना साथ न देण्याचा पवित्रा पक्षाने घेतला. त्यामुळे जे.एम. म्हात्रे यांनी अखेर आपला निर्णय जाहीर करत महाविकास आघाडीतून बाहेर पडण्याचा निर्णय जाहीर केला आणि या निर्णयाला त्यांच्यासोबत अनेक पदाधिकारी, लोकप्रतिनिधी व कार्यकर्त्यांनी साथ दिली. त्यामुळे त्यांचाही विचार लक्षात घेऊन म्हात्रे यांनी भाजप या राष्ट्रीय पक्षात जाण्याचा निर्णय केला. माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे गेली ४८ वर्षे शेकापचा प्रामाणिक कार्यकर्ता म्हणून काम करीत होते. पक्षाने दिलेली प्रत्येक जबाबदारी ते प्रामाणिकपणे बजवायचे, पण नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकीत उरण मतदारसंघातून त्यांचे पुत्र प्रितम म्हात्रे यांच्या विरोधात महाविकास आघाडीने काम केले होते. एकेकाळी अभिमानाने राजकारणात असलेल्या शेतकरी कामगार पक्षाला मोठी घरघर लागली, पण शेकापच्या नेतृत्वाने ते कधीही मान्य केले नाही. आणि त्यामुळे शेकापच्या नेत्यांना या कारभाराचा कंटाळा आला. पक्ष क्षीण झाला आणि जनाधारही दिवसेंदिवस घटत चालला. मागील महिन्यात जयंत पाटील यांचे बंधू माजी आमदार पंडितशेठ पाटील, माजी मंत्री स्व. मीनाक्षीताई पाटील यांचे पुत्र व रायगड जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष ॲड. आस्वाद पाटील यांनी हजारो समर्थकांसह भाजपत प्रवेश करत अलिबागमध्ये जोरदार धक्का दिला. त्यानंतर काही दिवसांतच पनवेलमध्ये शेकापला मोठा दणका मिळाला. प्रभूदास भोईर यांनी पंधराशे कार्यकर्त्यांसह भाजपमध्ये प्रवेश केला. शेकाप या झटक्यातून सावरत नाही तोच जे.एम.म्हात्रे, प्रितम म्हात्रे यांनी पदाधिकारी व हजारो कार्यकर्त्यांसह भाजपमध्ये प्रवेश करून रायगड जिल्ह्याच्या राजकारणात मोठी खळबळ उडवून दिली. त्यामुळे पुन्हा एकदा विचार करण्याची वेळ शेकापवर आली आहे.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून खासदार धैर्यशील पाटील, आमदार विक्रांत पाटील, माजी आमदार पंडितशेठ पाटील, माजी आमदार सुरेश लाड, कोकण म्हाडाचे माजी सभापती बाळासाहेब पाटील, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष ॲड. आस्वाद पाटील, 'दिबां'चे पुत्र अतुल पाटील, भाजपचे ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, रवी भोईर, माजी महापौर कविता चौतमोल, माजी सभागृहनेते परेश ठाकूर, भाजपचे जिल्हा सरचिटणीस ॲड. प्रकाश बिनेदार, दीपक बेहेरे, चारुशीला घरत, माजी जिल्हा परिषद सदस्य राजेंद्र पाटील, संजय पाटील, माजी नगरसेवक अनिल भगत, खारघर मंडळ अध्यक्ष प्रवीण पाटील, कामोठे मंडळ अध्यक्ष विकास घरत, कळंबोली मंडळ अध्यक्ष अमर पाटील, पनवेल शहर मंडळ अध्यक्ष सुमित झुंझारराव, नवीन पनवेल मंडळ अध्यक्ष दशरथ म्हात्रे, तळोजा मंडळ अध्यक्ष दिनेश खानावकर, नेरे मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील, कर्नाळा मंडळ अध्यक्ष मंगेश वाकडीकर, उलवे मंडळ अध्यक्ष रूपेश धुमाळ यांच्यासह लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

***माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे हे सामाजिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रात काम करणारे व्यक्तिमत्व आहेत. भाजप जिल्हात एक नंबरचा पक्ष बनत आहे. खासदार, आमदार, ते सरपंच, लोकप्रतिनिधी तळागाळातील लोकांसाठी काम करत आहेत. २०१८ साली रवींद्र चव्हाण रायगडचे पालकमंत्री झाले आणि जिल्ह्यातील एक एक करत निवडणुका जिंकत गेलो. आता प्रत्येक स्तरावर भाजपचे नेतृत्व आहे. कणखर नेतृत्व पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली सरकार जनतेसाठी अग्रेसरपणे काम करत आहे. देशहितासाठी काम करणाऱ्या पक्षात आलो आहोत याचा तुम्हाला नक्कीच समाधान आणि अभिमान वाटेल. पनवेल, उरण, खालापूरमधून तुमच्यासोबत आलेल्या कार्यकर्त्यांच्या या प्रवेशामुळे पक्षाची ताकद मोठ्या प्रमाणात वाढली आहे.***

***–आमदार प्रशांत ठाकूर***

***प्रितम म्हात्रे हे समाजाला जोडले आहेत, तर जे.एम. म्हात्रे पक्षभेद बाजूला ठेवून लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या सोबतीने काम करत आहेत. आजच्या या प्रवेशाने ताकद वाढली आहे. आजचा पक्षप्रवेश आणि झेंडा देशप्रेमाचा आहे, त्यामुळे आगामी जिल्हा परिषद, महानगरपालिका, नगरपालिका, पंचायत समिती, ग्रामपंचायत निवडणुका शंभर टक्के जिंकणार याची मला खात्री आहे. पक्षात जुना नवा असा कोणताही विचार न करता एकसंघ काम करत राहू या.***

***–आमदार महेश बालदी***

***केंद्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यामुळे विकासाला मोठी गती मिळाली. विकासाचा ओघ लक्षात घेऊन विविध पक्षातील कार्यकर्त्यांचा ओढा वाढत आहे. देशातील सर्वात मोठा राजकीय पक्ष ज्याचे १४ कोटी सदस्य आहेत आणि सर्वात जास्त लोकप्रतिनिधी आहेत. जिल्ह्यात २०१४ साली आमदार प्रशांत ठाकूर यांच्या रूपाने पहिला आमदार, त्यानंतर २०१९ला त्यामध्ये महेश बालदी यांच्या रूपाने आणखी एक आमदार आणि आता २०२४च्या निवडणुकीतून आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, आमदार रविशेठ पाटील तसेच खासदार म्हणून धैर्यशील पाटील, विधान परिषद सदस्य म्हणून विक्रांत पाटील अशी एकूण लोकप्रतिनिधींची ताकद वाढली आहे. त्यामुळे जगात, राज्यात आणि रायगडमध्येही भाजप क्रमांक एकचा पक्ष आहे.***

***–अविनाश कोळी, जिल्हाध्यक्ष, उत्तर रायगड जिल्हा भाजप***

# नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामुळे भावी पिढीचे आयुष्य यशस्वी होईल

## भाजप कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांचे प्रतिपादन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भावी पिढीचे आयुष्य यशस्वी करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणले आहे, असे प्रतिपादन माजी मंत्री व भाजपचे प्रदेश कार्यकारी अध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण यांनी केले. भारतीय जनता पक्ष महाराष्ट्र राज्य पदवीधर प्रकोष्ठ, आदर्श शैक्षणिक समूह संचालित श्री.बापूसाहेब डी.डी विसपुते शिक्षणशास्त्र महाविद्यालय नवीन पनवेल आणि यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ विद्यार्थी कल्याण व बहि:शाल केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने नवीन पनवेल येथे शनिवारी (दि.१०) 'नवीन शैक्षणिक धोरण २०२० – संधी आणि आव्हाने' या विषयांतर्गत शिक्षण परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेचे उदघाटक म्हणून ते बोलत होते.

रवींद्र चव्हाण यांनी पुढे बोलताना सांगितले कि, विद्यार्थी दशेपासून चांगला नागरिक घडवण्याचे काम हे शिक्षकांच्या हाती आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये राष्ट्र प्रथम हि भूमिका आहे. आपण देशाचे सुजाण नागरिक असलो पाहिजे त्यासाठी देश प्रथम हि भावना मुळातच महत्त्वाची आहे. त्यामुळे भावी पिढीला या सर्व बाबी ज्ञात असल्या पाहिजेत, यासाठी शिक्षक आणि पालकांनी देशहित प्रथम बिंबवले पाहिजे. राष्ट्रीय शिक्षण धोरणात गुरुकुल तसेच कौशल्य आधार शिक्षण आहे. आणि त्याचा फायदा विद्यार्थ्यांना सशक्त होण्यासाठी होणार आहे. भारत पाकिस्तान युद्ध सुरू आहे त्यामध्ये पाकिस्तान घाबरून गेला आहे तर आपल्या भारतातील जनता सुरक्षित आहे, ते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वामुळे आणि ते पण एक राष्ट्रहिताचे धोरण आहे, असेही त्यांनी या वेळी नमूद केले.

राज्यसभेच्या खासदार मेधाताई कुलकर्णी यांनी बोलताना सांगितले कि, खूप वर्षानंतर भारतात नवीन शैक्षणिक धोरण आले आहे. देशाला व विद्यार्थ्याला



परिपूर्ण करणारे हे धोरण आहे. शिक्षण घेताना मातृभाषा प्रथम भाषा असली पाहिजे जीवनावश्यक शिक्षण हि काळाची गरज आहे. देशाचे भवितव्य विद्यालयाच्या वर्गखोल्यामध्ये घडत असते. पुस्तकांपेक्षा त्यातून राष्ट्रीयत्वाचे शिक्षण, कौशल्याचे शिक्षण, संस्कार दिले तर विकसित भारत घडायला वेळ लागणार नाही. भारत पाकिस्तान युद्धावर भाष्य करताना त्यांनी, किती संकटे आली तरी आपला देश सक्षम उभा आहे, त्यामुळे विश्वगुरू बनण्याची ताकद आपल्या देशात आहे. या युद्धातून देशाची भौगोलिक स्थिती वाढणार आहे आणि त्या अनुषंगाने एक इतिहास घडणार आहे, असेही त्यांनी अधोरेखित केले.

नव्या शैक्षणिक धोरणाने भारताला नवी दिशा मिळणार आहे. या धोरणाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची आहे. आजची शैक्षणिक परिषद हि विचारांची ठोस उपाययोजना ठरणारी होईल, असे मत भारतीय जनता पार्टी पदवीधर प्रकोष्ठचे प्रदेश संयोजक व आदर्श शैक्षणिक संकुलाचे चेअरमन धनराज विसपुते यांनी प्रास्ताविकातून व्यक्त केले. यावेळी पदवीधर मतदारसंघाचे आमदार निरंजन डावखरे, शिक्षक मतदारसंघाचे आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे, तज्ज्ञ मार्गदर्शक भाजपा शिक्षक आघाडीचे संयोजक डॉ. प्रशांत कोल्हे यांचीही समयोचित भाषणे झाली.

देवद–विचुंबे येथील दादासाहेब श्री. धनराजजी विसपुते सभागृह आदर्श शैक्षणिक संकुलात झालेल्या परिषदेला प्रमुख पाहुणे म्हणून विधानसभेचे आमदार प्रशांत ठाकूर, विधान परिषदेचे आमदार विक्रांत पाटील, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे, कोकण विभागाचे विभागीय महासंचालक डॉ. विजय नारखेडे, ज्येष्ठ विचारवंत प्रकाश पाठक, आंतरविद्या शाखेचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. चंद्रशेखर चक्रदेव, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, माजी नगरसेवक गणेश कडू, आदर्श शैक्षणिक संकुलाचे चेअरमन धनराज विसपुते, संचालिका संगिता विसपुते, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ विद्यार्थी कल्याण व बहि:शाल केंद्राचे संचालक डॉ. दयाराम पवार, श्री. बापूसाहेब डी. डी. विसपुते कॉलेज ऑफ एज्युकेशनच्या प्राचार्या अ‍ॅड. डॉ. सीमा कांबळे, यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

## निवडक

### नावडे येथून तरुण बेपत्ता

पनवेल : नावडे फेस दोन येथे राहणारा आदित दिलीप क्षीरसागर (वय ३२) हा पत्नीला भेटण्यासाठी ठाण्याला जात आहे असे सांगून घरातून निघून गेला. मात्र तो घरी परत न आल्याने तो हरवल्याची तक्रार तळोजा पोलीस ठाण्यात करण्यात आली. त्याचा रंग सावळा, उंची पाच फूट, दहा इंच, तो अंगाने मध्यम आहे. त्याचा चेहरा उभट असून नाक सरळ आहे. अंगात पांढऱ्या फुल बाह्यांचा शर्ट आणि निळ्या रंगाची जीन्स पॅन्ट घातली असून त्याला मराठी आणि इंग्रजी भाषा बोलता येते. या तरुणाबाबत अधिक माहिती असल्यास तळोजा पोलिसांशी संपर्क साधावा.

### मृतदेहाच्या वारसांचा शोध

पनवेल : तळोजा पोलीस एका मयत व्यक्तीच्या वारसांचा शोध घेत आहेत. मयत व्यक्तीचे नाव जावेद मामू असे असून तो लग्नमंडपाठिकाणी बेशुद्ध पडल्याने त्यास पनवेल उपजिल्हा रुग्णालयात तपासून मयत घोषित केले. त्याच्या वारसांचा शोध तळोजा पोलीस ठाण्याचे तपासिक अधिकारी म्हणून पोलीस उपनिरीक्ष उमेश गुटाळ हे करीत आहेत.

### एक्स्प्रेसमधून बॅग चोरली

पनवेल : उदगीर ते लोकमान्य टिळक टर्मिनसदरम्यान एक्स्प्रेस पनवेल स्थानकात आली असताना एका महिला प्रवाशाला आपली बॅग चोरीला गेल्याचे लक्षात आले. यामध्ये त्यांचा ४५ हजार ५०० रुपयांचा ऐवज चोरीला गेला आहे. या प्रकरणी त्यांच्या तक्रारीवरून पनवेल रेल्वे पोलीस ठाण्यात अज्ञातावर गुन्हा दाखल केला आहे.

## चारित्र्याच्या संशयावरून पत्नीची हत्या करणाऱ्या पतीस जन्मठेप

### मुलास पाच लाखांची नुकसानभरपाई

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील कोळखे, पेठ येथील बसेरा अपार्टमेंटमध्ये २४ फेब्रुवारी २०१९ रोजी गणपत लक्ष्मण पवार याने आपल्या पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेऊन तिची हत्या केली होती. या प्रकरणात जिल्हा न्यायाधीश १, पनवेल यांनी निकाल देत आरोपी पतीस जन्मठेपेची शिक्षा सुनावली असून, आरोपीच्या लहान मुलास पाच लाख रुपयांची नुकसानभरपाई देण्याचे आदेश दिलेत.

पोलिस पाटील पांडुरंग कोंडीराम जाधव यांनी दिलेल्या माहितीनुसार, २४ फेब्रुवारी २०१९ रोजी दुपारी २ च्या सुमारास कोळखे गावातील बसेरा अपार्टमेंटजवळ पोलीसांची हालचाल दिसल्याने त्यांनी घटनास्थळी धाव घेतली. तेथे रुम नं. १, ए विंगमध्ये बबिता गणपत पवार ही महिला बेशुद्ध अवस्थेत जमिनीवर पडलेली आढळून आली. तिच्या पोटात धारदार शस्त्राने भोसकण्यात आले होते व ती रक्ताच्या थारोळ्यात होती. तिचा पती गणपत पवार याने पत्नीचा खून केल्याची कबुली दिली आणि नंतर त्याने विषारी औषध प्राशन केल्याचे सांगितले. पोलिसांनी त्याला उपचारासाठी तातडीने रुग्णालयात पाठवले, तर बबिता पवार हिला पनवेल ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आले, मात्र डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले.

या घटनेतील विशेष बाब म्हणजे आरोपी व मयत यांचा अल्पवयीन मुलगा हा एकमेव प्रत्यक्षदर्शी साक्षीदार होता. न्यायालयाने या लहान मुलाच्या साक्षीवर विश्वास ठेवत आरोपीस पत्नीच्या खुनाबाबत दोषी धरले. जिल्हा न्यायाधीशांनी दिलेल्या निकालात मुलाच्या भविष्यासाठी पाच लाख रुपयांची नुकसानभरपाई जाहीर केली आहे. हा निकाल अन्यायाविरोधातील लढ्याचा एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरला असून, अशा प्रकरणांमध्ये लहान मुलांच्या साक्षांनाही महत्त्व दिले जाऊ शकते, हे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.



**पनवेल : भाजप कार्यकर्ते कादिर शेख यांनी फुट पॉईंट पनवेल या शॉप सुरू केले आहे. यानिमित्त तसेच त्यांच्या वाढदिवसानिमित्त भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी कादिर शेख यांना शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजप नेरे मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील, यतिन पाटील, अंकुश पाटील, संजय जैन आदी उपस्थित होते.**

## कोंबिंग ऑपरेशनद्वारे अवैध धंद्यांवर कारवाई

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुका पोलिसांनी कोंबिंग ऑपरेशनद्वारे मोठ्या प्रमाणात हद्दीतील अवैध धंद्यांवर कारवाई करून बेकायदेशीररित्या व्यवसाय करणाऱ्यांना चांगलाच दणका दिला आहे.

पोलीस उपायुक्त, परिमंडळ २ प्रशांत मोहिते, सहाय्यक पोलीस आयुक्त, पनवेल विभागाचे अशोक राजपूत यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक गजानन घाडगे व त्यांच्या पथकाने हद्दीतील कोनगाव, वावंजे, वाकडी, नेरे या भागामध्ये कोंबींग आपरेशनदरम्यान अवैध दारू विक्री, एनडीपीएस इत्यादी अवैद्य धंद्यांवर कारवाया केल्या. तसेच खारपाडा टोलनाका येथे नाकाबंदी दरम्यान नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर मोटर वाहन कायदांतर्गत कारवाई करण्यात आली.



























**उलवे नोड : शेकापचे ज्येष्ठ नेते तथा पनवेल नगर परिषदेचे माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांच्यासह पदाधिकारी, लोकप्रतिनिधींनी भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला. त्यावेळेची क्षणचित्रे...**

## संपादकीय

# युद्धविराम!

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर सुरू झालेल्या भारत-पाकिस्तानमधील युद्धजन्य परिस्थितीला शस्त्रसंधीमुळे अखेर पूर्णविराम लागेला, मात्र पाकिस्तानने शस्त्रसंधीचे उल्लंघन करून पुन्हा एकदा भारतावर हल्ले केले. यातून त्यांनी आपण कधीच सुधारणार नाही हे दाखवून दिले आहे.

**भारत आज जागतिक पातळीवर एक महत्त्वपूर्ण देश म्हणून उदयास येत आहे. खरंतर भारत आणि पाकिस्तान या दोन्ही देशांची एकाच वेळी विभाजनातून निर्मिती झाली. आज भारत एका वेगळ्या उंचीवर जाऊन पोहचलेला असताना दुसरीकडे पाकिस्तान मात्र अराजकतेच्या खाईत दिसून येतो. पाकिस्तानच्या दुर्दशेला ते स्वत:च कारणीभूत आहेत. स्वत: काही चांगले करायचे नाही आणि दुसरा काही करतोय म्हटल्यावर त्यांना पोटशूळ उठतो. विशेषत: भारताची प्रगती शेजाऱ्यांना पाहवत नाही. याच द्वेषभावनेतून ही विघ्नसंतोषी मंडळी भारताला नेहमी पाण्यात पाहत असतात. तेवढ्यावर न थांबता भारत कसा अडचणीत येईल हे शोधत असतात. वास्तविक भारताने पाकिस्तानला स्वातंत्र्यापासून म्हणजेच १९४७पासून अनेकदा ठेचले आहे. १९६५, १९७१ आणि १९९९च्या कारगिल युद्धातही भारताने पाकिस्तानाला चारीमुंड्या चीत केले, मात्र नापाक कारवायांसाठी प्रसिद्ध असलेल्या पाकड्यांचे शेपटू वाकडे ते वाकडेच! अलिकडच्या काही वर्षांत त्यांनी दहशतवाद्यांना मोठ्या प्रमाणात पोसले असून त्यांच्या माध्यमातून पाकिस्तान भारतामध्ये कारवाया करीत असते. हल्ले, बॉम्बस्फोट अशी कृत्ये ते करतात. त्याला भारताकडून वेळोवेळी प्रत्युत्तर दिले जाते. केंद्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली एनडीए अर्थात राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे सरकार सत्तेत आल्यापासून भारत हा पाकिस्तानला त्यांच्या घरात घुसून ठोकत आहेत. पुलवामा, उरी हल्ल्यानंतर भारताने केलेले स्ट्राईक पाकिस्तान कधीही विसरणार नाही. तरीही त्यांची खुमखुमी जात नाही. २२ एप्रिल रोजी पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद्यांनी जम्मू काश्मीरमधील पहलगाममध्ये अंदाधुंद गोळीबार केला. या हल्ल्यात २६ निष्पाप पर्यटकांना आपला जीव गमावावा लागला. यामध्ये २५ भारतीयांचा समावेश होता. पहलगाम येथील भ्याड हल्ल्यानंतर भारताने ऑपरेशन सिंदूर राबवत बदला घेतला. भारतीय लष्कराने पाकिस्तानची पळता भुई थोडी केली. पहिल्याच दिवशी पीओकेसह पाकिस्तानमध्ये घुसून दहशतवाद्यांचे एकूण नऊ तळ उद्ध्वस्त करण्यात आले. त्यानंतर पाकिस्तानी सैन्याने ड्रोनद्वारे हल्ले करण्याचा प्रयत्न केला असता ते यशस्वीपणे परतून लावले. भू, आकाश, जल प्रत्येक पातळीवर भारताच्या शूर जवानांनी शौर्य गाजवत शत्रूला नामोहरम केले. त्यामुळे पाकिस्तानने अमेरिकेमार्फत शस्त्रसंधी घडवून आणल्याचे सांगितले जाते. त्यानुसार घोषणा झाली. भारताने त्यास दुजोरा दिला, मात्र पाकिस्तानने थोड्याच वेळात पुन्हा कुरापती काढण्यास सुरुवात केली. त्यामुळे पाकिस्तानचे नक्की काय चाललंय हे समजायला मार्ग नाही. त्यांचे सैन्य व प्रमुख सरकारचे ऐकत नाही का, असा प्रश्न उपस्थित होतो. तसे जर असेल तर सरकारने ते जाहीर करायला हवे, मात्र अशा प्रकारे कोणतेही निवेदन समोर आले नाही. त्यानंतर दुसऱ्या दिवसापासून दोन्ही देशांमध्ये आता शांततेचे वातावरण आहे. दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी व संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्या उपस्थितीत सैन्याच्या तिन्ही दलांची महत्त्वपूर्ण बैठक शनिवारी झाली होती. या बैठकीत एक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला की यापुढे पाकिस्तानकडून केले गेलेले कोणतेही दहशतवादी कृत्य हे युद्ध मानले जाईल. त्यानुसार पाकड्यांना वेळोवेळी ठेचणे अनिवार्य बनले आहे.**

# अवकाळीच्या फटक्याने संपूर्ण कर्जत तालुका गारद

**खबरबात**
**विजय मांडे**

गेल्या वर्षी लोकसभेच्या निवडणुकीच्या मतदानाच्या दिवशी कर्जत तालुक्याला अवकाळी पावसाने होत्याचे नव्हते केले होते. नेमके त्याच वेळेस यंदाही अवकाळीने हजेरी लावली आणि तीन चार दिवस वादळी वाऱ्यासह पाऊस पडत होता. त्यामुळे ग्रामीण भागाबरोबरच शहरी भागातील जनजीवनही विस्कळीत झाले. विट उत्पादक, आंबा बागायतदार, दुबार भातपीक यांना चांगलाच फटका बसला. सर्वांचेच नुकसान झाले. विज पुरवठा खंडित झाल्याने पाणी पुरवठा योजना ठप्प झाल्याने ग्रामीण भागासह शहरी भागात राहणाऱ्या नागरिकांना पाण्यावाचून रहावे लागले. विवाह मुहूर्त सुद्धा नेमके याच दरम्यान होते. त्यांचाही हिरमोड झाला. साऱ्यांनाचा या अवकाळी पावसाचा चांगलाच फटका बसला.



गेल्या वर्षी १३ मे रोजी लोकसभा निवडणुकीसाठी मतदान होते. त्याच्या आदल्याच दिवशी संध्याकाळी नेरळ भागात पावसाने हजेरी लावली. यामध्ये गावागावांतील रस्त्यांवर पाणी साठले. त्यानंतर मतदानाच्या दिवशी पावसाने अशी सुरुवात केली की, बहुतांश भागात गारपीट झाली. मतदानावर या पावसाचा परिणाम झाला होता. प्रशासनाने पोलीस मैदानात उभारलेल्या भव्य मंडपातून आदल्या दिवशी सकाळी मत यंत्रे व मतदानासाठी लागणारे साहित्य एकदम नियोजन पध्दतीने कर्जत विधानसभा मतदार संघातील प्रत्येक मतदान केंद्रावर पोहचले होते. सकाळी मतदान सुरू झाले दुपारी पाऊस सुरू झाल्याने सारीच गणिते बिघडली होती. प्रशासनाने उभारलेल्या मंडपात पाणी शिरले. सगळा चिखल झाला. त्यामुळे रात्री येणारी मतयंत्रे व साहित्य जमा करण्यासाठी येणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना खूप त्रास झाला होता. रात्री दहा वाजेपर्यंत पोहोचणारे कर्मचारी पहाटे आपल्या घरी पोहोचले होते. यामध्ये महिला कर्मचाऱ्यांचे खूप हाल झाले होते. यंदा मे मध्ये विवाह मुहूर्त आहेत. हळद, लग्न सुरु आहेत. वादळी वाऱ्यामुळे मंडप कोसळले. त्यामुळे काढलेल्या विवाह मुहूर्तांचे गणित बिघडले. वऱ्हाडाला त्याचा फटका बसतोय. त्यामुळे अवकाळी पावसाने सर्वांनाच आपला हिसका दाखवला. त्यामुळे काही ठिकाणी साखरपुडे मंडपा ऐवजी घरात उरकावे लागले तर विवाह थोडे उशिरा लावायला लागले.

कर्जत तालुक्यात गावागावांतील घरांच्या छपरांचे पत्रे उडाले. यंदा कडक उन्हाळ्याने आंबा पिक चांगले आले होते. वादळी वाऱ्यासह पाऊस या मुळे आंबे पडले. त्यामुळे हातातोंडाशी आलेला घास निसर्गाने काढून घेतला. दुबार भात पीक तयार झाले होते. ते कापून वाळविण्यासाठी शेतात ठेवले होते. मात्र धुवाधार पावसाने त्या पिकाची दशा झाली. त्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले. नेरळ मध्ये विज कोसळली. त्यामुळे परिसरातील नागरिक भयभीत झाले होते. माथेरानमध्ये अवकाळीने पर्यंटन कोसळले. वीज खंडित झाल्यामुळे पर्यटकांना त्रास झाला.

वादळी वाऱ्याने विजेचे खांब कोसळले. त्यामुळे वीज पुरवठा बंद झाला. काही भागात अनेक तास तर काही भागात दिवसभर अंधार होता. महावितरणच्या अधिकाऱ्यांनी व कर्मचाऱ्यांनी दिवसाची रात्र करून वीज पुरवठा सुरळीत केला.

# रायगडात सृष्टी निघाली न्हाऊन, वातावरण आल्हाददायक बदल, प्राणी पक्षी सुखावले

रायगड जिल्ह्यात मागील चार ते पाच दिवसांपासून वळीवाचा पाऊस पडत आहे. आणि या पावसामुळे येथील सृष्टी न्हाऊन निघाली आहे. तसेच वातावरण आल्हाददायक बदल झाले आहेत. वातावरणात गारवा पसरला आहे. शिवाय प्राणी पक्षी देखील सुखावले आहेत.

वळीवाच्या पावसामुळे नागरिक तसेच पशुपक्ष्यांनाही वाढत्या उष्म्यापासून दिलासा मिळाला आहे. नागरिकांना गारव्यामुळे सुखद अनुभूती मिळाली. पावसामुळे पशु पक्षी देखील आनंदी आहेत. त्यांनाही पाण्याची मुबलक उपलब्धता निर्माण झाली आहे.

पावसामुळे आकाशात काळे, पांढरे, राखाडी छटा असलेले ढग एकमेकांत गुंफलेले दिसतात. कुठे काळ्या ढगांच्या गर्दीत पांढऱ्या ढगांचे हलके फुलकीदार थर, तर कुठे काळ्या पांढऱ्या ढगांचे विलक्षण आकार लक्ष वेधत आहेत. ढगांच्या समूहातून सूर्याच्या किरणांचे झोत बाहेर पडताना दिसत आहेत, जणू स्वर्गाच्या दारात उघडलेली एक नैसर्गिक कलाकृती. ढगांच्या या अनोख्या जुगलबंदीमुळे आभाळ एक जिवंत चित्रपटाच्या पडद्यासारखे भासते.

वळीवाचा पाऊस किंवा अवकाळी पाऊस आला असला तरी या पावसामुळे मुंग्या व वाळवी यासारखे प्राणी सक्रीय झाले आहेत. तसेच सरडे, पाली व बेडूक हे देखील बाहेर पडतात. हे सर्व प्राणी अनेक पक्षांचे आवडीचे भक्ष असते. त्यामुळे अवकाळी पावसामुळे पक्षांना खाद्याची मात्र चांगली उपलब्धता झाली आहे. तसेच पावसामुळे अनेक ठिकाणी



डबकी, नदी ओहोळ यांच्यात काही प्रमाणात पाणी साठले आहे. त्यामुळे पक्षांसह इतर प्राण्यांचीही पाण्यासाठी वणवण थांबली आहे.

उन्हाच्या काहीलीने तापून निघालेली सृष्टी अवकाळी पावसामुळे आता थंड झाली आहे. सर्वत्र गारवा पसरला असून वातावरण आल्हाददायक झाले आहे. परिणामी रायगड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात आलेले पर्यटक देखील सुखावले असून पर्यटनाचा आनंद घेत आहे.

झाडांवर आच्छादलेली धूळ पावसामुळे गळून पडली आहे. त्यामुळे झाडे देखील आता मोकळा श्वास घेत आहेत असे वाटते. धुळीने झाकोळलेली झाडे आता हिरवीगार व टवटवीत दिसत आहेत.

सध्याच्या अवकाळी पावसामुळे काही ठिकाणी जंगल परिसरात लागलेले वणवे पूर्णपणे थांबले आहेत. वातावरणातील प्रदूषके खाली बसून प्रदूषण कमी झाले आहे. असहाय्य होत असलेल्या उन्हाळ्याच्या गर्मीमध्ये वातावरणात गारवा आला आहे. पशु पक्षांनादेखील गारवा व पाण्याची उपलब्धता झाली आहे.

उमटे धरणाच्या पाण्याने तळ गाठला होता. त्यामुळे पाणी टंचाईचे सावट होते. मात्र अवकाळी पावसामुळे धरणात काही प्रमाणात का होईना पाणी साठा वाढला आहे. परिणामी पाणीटंचाईचे संकट कमी झाले आहे. जणू काही पावसाला आमचे दुःख कळले असे वाटते आहे.

**-धम्मशील सावंत,** पाली

## बदलते तंत्रज्ञान

### उन्हाळ्यात स्मार्टफोन ओव्हरहीट होऊ शकतो:

अति उष्णतेचा केवळ मानवी आरोग्यावर परिणाम होत नाही, तर ते तुमच्या स्मार्टफोनसाठीदेखील धोकादायक ठरू शकते. तापमान वाढत असताना, फोन वेगाने गरम होऊ लागतो. यामुळे त्याच्या कार्यक्षमतेवर परिणाम होतो, बॅटरी संपते आणि कधीकधी डिव्हाइस अचानक बंद देखील होऊ शकते. सतत जास्त गरम झाल्यामुळे फोनचे कायमचे नुकसान होऊ शकते. अशा परिस्थितीत, या उन्हाळ्यात तुमचा स्मार्टफोन जास्त गरम होण्यापासून वाचवण्यासाठी काही विशेष खबरदारी घेणे आवश्यक आहे.



उन्हाळ्यात फोन जास्त गरम होण्यामागे अनेक कारणे आहेत. तीव्र सूर्यप्रकाश, सतत वापर, हेवी ॲप्स आणि चार्जिंग यासारख्या गोष्टी फोनचे तापमान वाढवू शकतात.

जर फोन खूप गरम झाला, तर त्याच्या कार्यक्षमतेवर परिणाम होतो. फोन हळू चालायला लागतो, हँग होऊ शकतो किंवा अचानक बंदही होऊ शकतो.


याशिवाय, सर्वात जास्त नुकसान बॅटरीचे होते. जास्त उष्णतेमुळे फोनची लिथियम-आयन बॅटरी लवकर खराब होऊ शकते. यामुळे बॅटरी फुगू शकते आणि तिचे आयुष्य कमी होऊ शकते. कधीकधी फोन जास्त गरम झाल्यामुळे स्फोट देखील होऊ शकतो. काही स्मार्टफोनमध्ये सुरक्षा व्यवस्था असते. जेव्हा फोनचे तापमान खूप जास्त (सुमारे ४५ओउ) होते तेव्हा ही प्रणाली आपोआप सक्रिय होते. फोनचा वेग कमी होतो.

जर तुमचा स्मार्टफोन हातात घेताच खूप गरम वाटत असेल, तर हे जास्त गरम होण्याचे पहिले लक्षण आहे. जेव्हा तुम्ही बराच वेळ गेम खेळता, व्हिडिओ कॉल करता, हेवी ॲप्स चालवता किंवा चार्जिंग करताना फोन वापरता तेव्हा असे होते. याशिवाय इतरही काही चिन्हे आहेत. जसे की-फोनची कार्यक्षमता मंदावू शकते.

बॅटरी लवकर संपू लागते.टच अचानक काम करणे थांबवू शकतो. टेक तज्ज्ञ उपेंद्र शर्मा म्हणतात की, नेहमी मूळ चार्जर आणि केबल वापरावे. जर फोन गरम झाला तर ताबडतोब चार्जिंग थांबवा. याशिवाय, चार्जिंग पोर्ट स्वच्छ आणि कोरडा ठेवणे देखील खूप महत्वाचे आहे, जेणेकरून फोन सुरक्षित राहील आणि बॅटरीचे आयुष्य जास्त काळ टिकेल

# भगवान गौतम बुद्ध जयंती अर्थात बुद्ध पौर्णिमा

**निमित्त**



हिंदू धर्मात पौर्णिमा तिथीला विशेष महत्त्व आहे. वर्षभरात राखी पौर्णिमा, कोजागरी पौर्णिमा आदी सण साजरे केले जातात. यात आणखी एक पौर्णिमा विशेष महत्त्वाची असते. वैशाख महिन्यात बुद्ध पौर्णिमा साजरी केली जाते. या दिवशी भगवान गौतम बुद्ध यांची जयंती असते. त्यामुळे ही पौर्णिमा हिंदू धर्मीयांसह बौद्ध धर्माच्या अनुयायांसाठी महत्त्वाची असते. यंदा बुद्धपौर्णिमा नेमकी कधी आहे, तिचा मुहूर्त कोणता इ. सविस्तर जाणून घेऊया.

पौर्णिमेच्या दिवशी गरजूंना दान देणं, पवित्र नदीत स्नान करणं आणि लक्ष्मी मातेची पूजा करणं यास महत्त्व दिलं जातं. वैशाख महिन्यातल्या पौर्णिमेला बुद्ध पौर्णिमा असंही म्हणतात. या दिवशी भगवान गौतम बुद्धांची जयंती असते. भगवान बुद्धांचा जन्म नेपाळमधल्या लुंबिनी इथे झाला. त्यांच्या पित्याचं नाव राजा शुद्धोधन आणि आईचं नाव महामाया असं होतं. भगवान बुद्धांचं नाव सिद्धार्थ होतं. वयाच्या १६व्या वर्षी त्यांचा विवाह यशोधराशी झाला.

राजकुमार असून गौतम बुद्धांना कोणत्याही भौतिक गोष्टींचा मोह नव्हता. त्यामुळे त्यांनी घराचा त्याग केला. पत्नी यशोधरा, मुलगा राहुल हे झोपलेले असताना ते त्यांना सोडून जंगलात निघून गेले. सत्य आणि ज्ञानाच्या शोधात त्यांनी भटकंती आणि तपश्चर्या केली. अखेरीस बोधिवृक्षाखाली त्यांना आत्मज्ञान प्राप्त झालं आणि ते बुद्ध म्हणून ओळखले जाऊ लागले.

भगवान बुद्धांचा जन्म वैशाख पौर्णिमेला झाला आणि त्याच दिवशी त्यांना बोधिज्ञान प्राप्त झालं. त्यामुळे या पौर्णिमेला बुद्धपौर्णिमा असं म्हणतात. या दिवशी भगवान बुद्धांची पूजा केली जाते. विशेष म्हणजे वैशाख पौर्णिमेच्या दिवशीच कुशीनगरमध्ये त्यांचं महापरिनिर्वाण झालं.

पंचांगानुसार यंदा वैशाख पौर्णिमा म्हणजेच बुद्ध पौर्णिमा १२ मे रोजी आहे या वर्षी भगवान बुद्ध यांची २५८७वी जयंती आहे.

भगवान बुद्धांना भगवान विष्णूचा नववा अवतारदेखील मानलं जातं. बुद्ध पौर्णिमा जगातील दुःख नाहीसे करण्यासाठी भगवान गौतम बुद्धांनी निरनिराळे मार्ग अनुसरले. यासाठी स्वतःचे घरदार सोडून ध्यान मार्ग आणि तपश्चर्येचा मार्गही अनुभवला. वैशाख शुद्ध पौर्णिमेला त्यांना ज्ञान प्राप्त झाले आणि दुःखाचे मूळ आणि ते नाहीसे करण्याचा मार्ग सापडला. यासाठी ही पौर्णिमा बुद्ध पौर्णिमा म्हणून साजरी केली जाते.

बुद्ध पौर्णिमेनिमित्त भगवान बुद्धांनी काही उपदेश केले आहेत. यामध्ये आपल्या मोक्षासाठी स्वतःच प्रयत्न करा. इतरांवर अवलंबून राहू नका. रागाच्या भरात हजार शब्द चुकीचा उच्चारण्यापेक्षा मौन हा एक शब्द जीवनात शांती आणणारा आहे. तुमच्याकडे जे आहे त्याची अतिशयोक्ती करू नका किंवा इतरांचा मत्सर करू नका. वाईटाचा वाईटाने कधीच अंत होत नाही. द्वेषाचा अंत फक्त प्रेमानेच होऊ शकतो, हे अटळ सत्य आहे. (साभार : इंटरनेट)

## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

### चुकुनही खाऊ नका 'हे' पदार्थ; उद्भवेल धोका!

आपले आरोग्य आपल्या आहारावर अवलंबून असते, म्हणजेच आपल्या चांगल्या आरोग्यामध्ये आपला आहार ८० टक्के भूमिका बजावतो. त्यामुळे विशेषत: डायबिटीस, हृदय आणि रक्तदाब यासारख्या आजारांनी ग्रस्त असलेल्या रुग्णांनी आपल्या आहाराची विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. जगभरात हृदयविकाराच्या रुग्णांची संख्या वाढत आहे. यामागे अनेक कारणे असू शकतात, परंतु त्यापैकी बहुतांश कारणांमध्ये खराब जीवनशैली आणि आहार यांचा समावेश आहे.



आहारात केलेल्या अनेक छोट्या-छोट्या चुका कधीकधी हृदयविकाराचा धोका वाढवतात. त्यामुळे हृदयाच्या आजाराने त्रस्त असणारे काय खातात आणि काय खात नाहीत. या दोन्ही गोष्टी खूप महत्त्वाच्या आहेत. हृदयरोगींनी आपल्या आहारात अशा गोष्टींचा समावेश करावा ज्याने कोलेस्ट्रॉल वाढणार नाही.

मैद्याचे सेवन हृदयाच्या रुग्णांसाठी हानिकारक आहे. कॅलरी जास्त असण्यासोबतच मैदा हे फॅट आणि कोलेस्ट्रॉल दोन्ही वाढवते. त्यामुळे हृदयविकाराचा धोकाही वाढतो. त्यामुळे पिठापासून बनवलेल्या वस्तू खाणे टाळावे.

नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ हेल्थच्या म्हणण्यानुसार अंड्यातील पिवळ्या भागात पोषक तत्वांसह चरबीचे प्रमाण जास्त असते, ज्यामुळे कोलेस्ट्रॉल वाढण्याचा धोकाही वाढतो. त्यामुळे हृदयरोग्यांनी अंड्यातील पिवळा बलक कमी प्रमाणात सेवन करावा. तुम्ही आठवड्यातून जास्तीत जास्त एकदा किंवा दोनदा अंड्यातील पिवळा बलक खाऊ शकता.

जास्त प्रमाणात कॉफीचे सेवन हृदयरोग्यांसाठी हानिकारक ठरू शकते. कॉफीमध्ये असलेले कॅफिन हृदयाचे ठोके वाढवते आणि रक्तदाब वाढवते. जास्त प्रमाणात कॉफी पिणे किंवा दिवसातून दोन कपपेक्षा जास्त कॉफी घेतल्याने हृदयरोग्यांमध्ये अटॅक येण्याचा धोका वाढतो.

फळांच्या रसामध्ये साखर आणि कॅलरीज दोन्ही जास्त प्रमाणात असतात, जे हृदयासाठी चांगले नाही. त्यामुळे हृदयरोग्यांनी फळांच्या रसांऐवजी फळे डायरेक्ट खावीत. पण आंबा सारख्या फळांचेही कमी प्रमाणात सेवन करावे.

पिस्ता एक ड्राय फ्रुट असून त्यात सोडियमचे प्रमाण जास्त असते. त्यामुळे हृदयरोग्यांनी याचे कमी प्रमाणात सेवन करावे. पिस्त्यात सोडियमचे प्रमाण जास्त असते, ज्यामुळे उच्च रक्तदाब होऊ शकतो.

# राजनाला कालवा परिसरातील शेतीचे मोठे नुकसान

## दुबार शेतीला अवकाळीचा मोठा फटका

**कर्जत : प्रतिनिधी**

अवकाळी पाऊस आणि वादळी वाऱ्याने झोडपले. दररोज अवकाळी पावसाने वादळी वाऱ्यासह हजेरी लावली आणि शेतकऱ्यांचे हातात आलेले पीक जाण्याची स्थिती निर्माण केली आहे. अवकाळी पावसाने दुबार शेती करणाऱ्या शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले असून भाताचे शेतात बहरलेले पीक मोठ्या प्रमाणात जमिनीवर कोसळले असून शेत पाण्याने भरली आहेत. राजनाला कालवा परिसरात पावसाने हजारो हेक्टर जमिनीवर भाताचे पीक धोक्यात आणले आहे.

मंगळवारी सायंकाळ पासून वादळी वाऱ्याला सुरुवात झाली होती आणि त्यांनतर रात्री दहाच्या सुमारास विजाच्या लखलखाट तसेच पाऊस सुरू झाला. रात्रीच्या वेळी साधारण एक तास चांगला पाऊस झाला आणि त्यावेळी शेती पिकाचे मोठे नुकसान झाल्याने शेतकरी दिवस उजडण्याची वाट पाहत होता. त्यातही पावसामुळे लग्न सराई मधील लग्न सोहळ्यातील कापडी मंडप यांचे मोठे नुकसान झाले. त्यामुळे लग्न सोहळ्यावर विरजण आले असून आज पुन्हा पाऊस येऊ शकतो यामुळे यजमान लोक बंदिस्त सभागृह यांचा शोध घेत आहेत. आजची सकाळी ढगाळ वातावरण होते आणि त्यानंतर सकाळी अकराचे सुमारास पाऊस पुन्हा वादळी वाऱ्यासह आला आणि त्या पावसाने शेतकरी,लग्न सोहळे, विट भट्टी उत्पादक यांचे कंबरडे अक्षरशः मोडले आहे.

सर्वाधिक नुकसान हे कर्जत तालुक्यातील पाझर तलाव आणि राजनाला कालव्याचे पाण्यावर भाताची शेती करणाऱ्या शेतकऱ्यांचे मोठे नुकसान केले आहे. तालुक्यात कर्जत पूर्व भागात राजनाला कालव्याचे पाणी शेती साठी सोडले जाते.या कालव्याचे पाण्यावर यावर्षी १०४० हेक्टर जमिनीवर भाताची शेती केली आहे. त्यात ३० एप्रिल पासून पाटबंधारे विभागाने कालव्यात पाणी सोडण्याचे बंद केले आहे.मात्र राजनाला कालवा परिसरातील ३० गावातील बहुसंख्य शेतकऱ्यांनी भाताची पिके कापणी सुरू केली आहे. १२ तासांत दोनदा झालेल्या अवकाळी पाऊस यामुळे मोठ्या प्रमाणात शेतात उभे असलेले आणि कापणी करून ठेवलेले भाताचे पीक भिजले आहे. हे भाताचे पिके शेतातच कुजून जाण्याची भीती व्यक्त करण्यात येते आहे. राजनाला कालवा परिसरात वेणगावपासून कडाव आणि पोटल हुमगाव वैजनाथ पासून हेदवली सावळे पर्यंत सर्व गावातील शेतीचे व दुबार शेती करणाऱ्या शेतकऱ्यांचे अवकाळी पावसाने नुकसान केले आहे.



**PUBLIC NOTICE**

**Kasturi 2 CHS**, Plot # 456, Village-Takka, Panvel has given a paper notice for calling redevelopment tender on 1 May 25.The society has 6 Row Houses /Bunglows in it. The said tender document was not discussed/nor consented by Row house members. So we, the row house members have objections for the tender document. Since there is a **dispute** between the Society and the row house members we request everyone to take cognizance of it and not to apply on this tender notice otherwise it will be null and void.

**Members of Row House #1-6 Kasturi 2 CHS, Plot # 456, Village-Takka, Panvel. PIN 410206.**


सोमवार दि. १२ मे २०२५ दु. ४.३० वा. डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृह (मिनी) ठाणे

गुरुवार दि. १५ मे २०२५ रात्री ८.३० वा. यशवंत नाटयमंदिर, माटुंगा

अनामिका थिएटर्स निर्मित

तिकिट दर १००/-

रिप्लेक्शन थिएटर, पनवेल

प्रस्तुत

इतना सन्नाटा क्यो है भाई ?

प्रायोगिक नाटक

संकल्पना/ लेखन/दिग्दर्शन-संकेत सुषमा सुनिल गायकवाड

नेपथ्य-मच्छिंद्र पाटील, प्रकाशयोजना -श्याम चव्हाण

रंगभूषा - उदयराज तांगडी, संगीत - श्रेयश गायकवाड,

वेशभूषा - संदेश पाटील, जान्हवी सरपोतदार, डिझाईन- सुचित मोहिते

व्यवस्थापक - मृण्मय काणे, रंगमंच व्यवस्था - अमित जोशी, सुत्रधार - उदयराज तांगडी

प्रयोगासाठी संपर्क : ९०८२३८२६५३

तिकिट विक्री नाट्यगृहावर सुरु आहे. संपर्क : ८८५०४११०३८


**सिडको**
शहरांचे शिल्पकार

# जाहीर सूचना

**विषय – महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १२६ अन्वये भूसंपादन करणेबाबत.**

१. राज्य शासनाने नवी मुंबई प्रकल्पाकरीता अधिसूचित क्षेत्राच्या उभारणीसाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ११३ अन्वये सिडको महामंडळास नवनगर विकास प्राधिकरण म्हणून घोषित केले आहे. नवी मुंबई प्रकल्पाकरीता जमीन संपादनासाठी निश्चित केलेल्या २२.५ % विकसित भूखंड वाटप योजनेअंतर्गत, नवनगर विकास प्राधिकरणाच्या अधिकारीतेत सिडको महामंडळाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम १२६ अन्वये नवी मुंबई प्रकल्पाकरीता अधिसूचित जमिनींच्या संपादनाच्या नोटिसा सिडको संकेतस्थळ व दैनिक वर्तमानपत्रांमध्ये यापूर्वी प्रसिद्ध केल्या आहेत.

२. याद्वारे नोटीस देण्यात येते की, भूमि संपादन अधिनियम, १८९४ अन्वये नवी मुंबई प्रकल्पाअंतर्गत **मौजे– मानघर, ता. पनवेल, जि. रायगड** येथील खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेली जमीन संपादन करण्याबाबत अनुक्रमे महाराष्ट्र शासन राजपत्र मुंबई विभाग, मुंबई क्र. LAQ-C-(१) ११३, दिनांक १४/०६/१९७३ मध्ये अधिसूचना प्रसिध्द करण्यात आली आहे.

३. भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना वाजवी भरपाई देण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ हा दि. ०१.०१.२०१४ पासून लागू झाला आहे. सदर अधिनियमातील कलम १०८ च्या उप–कलम (१) व (२) अन्वये राज्य शासनाच्या कायद्यान्वये किंवा धोरणान्वये संपादीत करावयाच्या जमीनीचा देय मोबदला व पुनर्वसनाचे लाभ हे सदर अधिनियमांच्या तरतुदीपेक्षा एकंदरीत जास्त देय असतील, तर संबंधित जमीनधारकाची राज्य शासनाच्या कायदा अथवा धोरणानुसार मोबदला व लाभ स्विकारण्यास संमती असेल, तर असा जास्तीचा मोबदला आणि पुनर्वसनाचे लाभ देय असलेल्या कायद्याच्या अथवा धोरणानुसार स्वीकारता येईल, अशी तरतूद आहे.

४. भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना वाजवी भरपाई देण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ अन्वये जमिनीच्या संपादनापोटी देय असलेल्या मोबदला व पुनर्वसनाच्या लाभापेक्षा जमीनधारकांना एकंदरीत जास्त लाभदायक तरतूदी देणारे धोरण राज्य शासनाने नगर विकास विभागाच्या शासन निर्णय क्र. सिआयडी/१८१२/प्र.क्र.२७४/नवि–१० दिनांक ०१.०३.२०१४ व शासन निर्णय क्र. सिआयडी/३३१७/१२९५/प्र.क्र.१८४/ नवि–१० दिनांक २८.०२.२०१८ अन्वये सिडको महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या नवी मुंबई विकास प्रकल्पाकरीता लागू केले आहे आणि सदर जमीन संपादन प्रक्रिया महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १२६ (१) अन्वये राबविण्यास मान्यता प्रदान केली आहे. सदर धोरणानुसार जमीन संपादनासाठी जमीनधारकाची संमती असल्यास त्यांना जमीन संपादनाच्या एकूण देय मोबदल्यापोटी २२.५% विकसित भूखंड वाटप योजनेअंतर्गत भूखंड वाटपाचे धोरण स्विकारले आहे.

५. राज्य शासनाने नगर विकास विभागाच्या शासन निर्णय क्र. सिआयडी/१८१२/प्र.क्र.२७४/नवि–१० दिनांक ०१.०३.२०१४ व शासन निर्णय क्र. सिआयडी/३३१७/१२९५/प्र.क्र.१८४/ नवि–१० दिनांक २८.०२.२०१८ अन्वये जमीन संपादनासाठी निश्चित केलेली नुकसान भरपाई व इतर लाभ जमीनधारकांना एकंदरीत फायदेशीर होत असतील व संबंधित भूधारकांनी सदर लाभ स्विकारल्यास अशा जमीनधारकांना भूमि संपादन अधिनियमान्वये वाढीव मोबदल्याबाबत कोणत्याही न्यायालयात अर्ज करण्याची मुभा राहणार नाही.

६. राज्य शासनाने नगर विकास विभागाच्या शासन निर्णय क्र. सिआयडी/१८१२/प्र.क्र.२७४/नवि–१० दिनांक ०१.०३.२०१४ व शासन निर्णय क्र. सिआयडी/३३१७/१२९५/प्र.क्र.१८४/ नवि–१० दिनांक २८.०२.२०१८ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १२६ (१) नुसार जमीन संपादन प्रक्रीया राबवून जाहीर करण्यात येणाऱ्या अंतिम संमती निवाड्याप्रमाणे अंतिमत: सर्व घटकांसह जमीनधारकांना देय होणाऱ्या २.५ चटई निर्देशांकासहीत १०% विकसीत जमीन व १२.५% भूखंड वाटप योजनेनुसार पात्र असणाऱ्या जमीनधारकांना १.५ चटई निर्देशांकासहीत विकसीत जमीन अनुज्ञेय राहील. त्यानुसार बाधीत जमीनधारकांस भूमि संपादनाच्या मोबदल्यात अनुज्ञेय व देय विकसीत जमिनीचा तपशील खालीलप्रमाणे आहे :–

| अ.क्र. | तपशील | विकसित जमिनीची टक्केवारी |
|---|---|---|
| १ | नुकसानभरपाईच्या रोख रकमेऐवजी विकसित जमीन | १०% |
| २ | १२.५% भू–वाटप योजना नुसार पात्र भूधारकांस विकसित जमीन | १२.५% |
| | एकूण मिळणारी विकसित जमीन २२.५% | २२.५% |

७. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १२६ (१) मधील तरतुदीनुसार व या अधिनियमाच्या कलम १५२ व ११६ नुसार मा. उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांनी अपर जिल्हाधिकारी तथा मुख्य भूमि व भूमापन अधिकारी (भूसंपादन), सिडको यांना प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन सूचित करण्यात येते की, खालील परिशिष्टात नमुद केलेल्या गावातील सर्व्हे नंबरनिहाय जमीनीबाबत मालक/कुळ व इतर हितसंबंधित व्यक्ती यांनी जमीन संपादनापोटी व उपरोक्त शासन निर्णयानुसार देय असणारा २२.५% विकसीत भूखंड मिळण्यास संमती असल्यास संमतीपत्रे किंवा हरकत असल्यास, ती लेखी स्वरूपात ही सूचना प्रसिद्ध झाल्यापासून/मिळाल्यापासून १५ दिवसाच्या आत अपर जिल्हाधिकारी तथा मुख्य भूमि व भूमापन अधिकारी (भूसंपादन) यांचे कार्यालय, १ ला मजला, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर – ४००६१४ येथे सादर कराव्यात.

८. परिशिष्टामध्ये नमूद करण्यात आलेले गावनिहाय सर्व्हे क्रमांकापैकी जे सर्व्हे क्रमांक पडताळणीच्या प्रक्रियेमध्ये CRZ व कांदळवन बाधित असल्याचे निदर्शनास येतील आणि ज्या सर्व्हे क्रमांकाच्या ७/१२ सदरी इतर अधिकार रकान्यात प्रचलित कायदयानुसार हस्तांतरणास बंदी अशी नोंद असेल तसेच सलग विकास योग्य नसेल, बांधकामे असतील, समुद्र सपाटीपासून ३० मीटर उंचीवरील सर्व्हे क्रमांकाच्या जमिनीच्या संपादनाबाबत प्रकरणनिहाय गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल.

९. परिशिष्टामध्ये नमूद करण्यात आलेल्या सर्व्हे क्रमांकापैकी काही सर्व्हे क्रमांकाची जमीन यापूर्वी नवी मुंबई प्रकल्पाकरीता अथवा अन्य प्रकल्पाकरीता सार्वजनिक प्रयोजनासाठी संपादित झाल्याचे दिसून आल्यास अथवा अन्य प्रकल्पाच्या प्रस्तावित संपादनामध्ये समाविष्ट असल्याचे दिसून आल्यास, अशा सर्व्हे क्रमांकाच्या जमिनीच्या संपादनाबाबत प्रकरणनिहाय गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल.

**परिशिष्ट**

**मौजे–माणघर, ता. पनवेल**

| अ.क्र. | अधिसूचित क्षेत्र (हे.आर.) | | | अलिबाग-विरार रस्त्यासाठी अधिसूचित क्षेत्र | सिडकोसाठी अधिसूचित क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|
| | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | ७/१२ नुसार क्षेत्र | | |
| १ | ७ | ० | ००-६७-५ | --- | ००-६७-५ |
| २ | १३ | ० | ००-४८-१ | --- | ००-४८-१ |
| ३ | १४ | ० | ०-६८-३ | --- | ०-६८-३ |
| ४ | १५ | ० | ००-२२-३ | --- | ००-२२-३ |
| ५ | १६ | ० | ००-६१-७ | --- | ००-६१-७ |
| ६ | १७ | ० | ००-६८-० | --- | ००-६८-० |
| ७ | २१ | ० | ०१-१०-३ | --- | ०१-१०-३ |
| ८ | २२ | ० | ००-३५-० | --- | ००-३५-० |
| ९ | २३ | ० | ००-३३-१ | --- | ००-३३-१ |
| १० | २४ | ० | ००-१८-५ | --- | ००-१८-५ |
| ११ | २५ | ० | ००-३२-९ | --- | ००-३२-९ |
| १२ | २६ | ० | ००-३६-४ | --- | ००-३६-४ |
| १३ | २७ | १ | ००-३५-० | --- | ००-३५-० |
| १४ | २७ | २ | ००-३१-० | --- | ००-३१-० |
| १५ | २८ | ० | ००-४८-१ | --- | ००-४८-१ |
| १६ | २९ | ० | ००-३४-१ | --- | ००-३४-१ |
| १७ | ३० | १ | ००-८०-२ | --- | ००-८०-२ |
| १८ | ३२ | ० | ००-४७-३ | --- | ००-४७-३ |
| १९ | ३४ | ० | ००-३१-० | --- | ००-३१-० |
| २० | ३६ | ० | ००-५५-९ | --- | ००-५५-९ |
| २१ | ३७ | ० | ००-३०-० | --- | ००-३०-० |
| २२ | ३९ | ० | ००-४१-० | --- | ००-४१-० |
| २३ | ४० | ० | ००-४१-७ | --- | ००-४१-७ |
| २४ | ४१ | ० | ००-४९-१ | --- | ००-४९-१ |
| २५ | ४२ | ० | ००-१७-२ | --- | ००-१७-२ |
| २६ | ४३ | १ | ०३-०६-९ | १-१४-६ | १-९२-३ |
| २७ | ४५ | १ | ०-२९-५ | ०-२७-८ | ०-०१-७ |
| २८ | ४६ | १ | ०-७७-५ | ०-६६-८५ | ०-१०-६५ |
| २९ | ४७ | ० | ००-४५-३ | ०-००-८ | ००-४४-५ |
| ३० | ४८ | ० | ००-७९-० | ०-०३-६५ | ०-७५-३५ |
| ३१ | ४९ | ० | ००-३३-० | --- | ००-३३-० |
| ३२ | ५० | ० | ००-२२-८ | --- | ००-२२-८ |
| ३३ | ५१ | ० | ००-३८-० | --- | ००-३८-० |
| ३४ | ५२ | ० | ००-१३-९ | --- | ००-१३-९ |
| ३५ | ५३ | ० | ००-६३-० | --- | ००-६३-० |
| ३६ | ५५ | ० | ००-३१-९ | --- | ००-३१-९ |
| ३७ | ५७ | ० | ००-२३-८ | --- | ००-२३-८ |
| ३८ | ५८ | ० | ००-७०-३ | --- | ००-७०-३ |
| ३९ | ५९ | ० | ००-२०-५ | --- | ००-२०-५ |
| ४० | ६० | ० | ००-४७-५ | --- | ००-४७-५ |
| ४१ | ६१ | ० | ००-१९-० | --- | ००-१९-० |
| ४२ | ६२ | ० | ००-२४-५ | --- | ००-२४-५ |
| ४३ | ६३ | ० | ००-१५-४ | --- | ००-१५-४ |
| ४४ | ६४ | ० | ००-६९-६ | --- | ००-६९-६ |
| ४५ | ६६ | ० | ०१-६२-० | --- | ०१-६२-० |
| ४६ | ६८ | ० | ०-१४-७ | --- | ०-१४-७ |
| ४७ | ७० | ० | ०-१६-० | --- | ०-१६-० |
| ४८ | ७१ | ० | १-५९-० | --- | १-५९-० |
| ४९ | ७२ | ० | ००-१८-२ | --- | ००-१८-२ |
| ५० | ७३ | ० | ००-१७-७ | --- | ००-१७-७ |
| ५१ | ७४ | ० | ४-१९-० | --- | ४-१९-० |
| ५२ | ७५ | ० | ००-२९-८ | --- | ००-२९-८ |
| ५३ | ७७ | ० | १-५६-० | --- | १-५६-० |
| ५४ | ७८ | १ | ०-३३-० | ०-५९-७ | ०-०२-५ |
| ५५ | ७८ | २ | ०-२९-२ | | |
| ५६ | ७९ | ० | ०-१२-६ | ०-०१-८ | ०-१०-८ |
| ५७ | ८६ | ० | ०-१३-७ | --- | ०-१३-७ |
| ५८ | ९९ | ० | ००-३८-४ | --- | ००-३८-४ |
| ५९ | १०० | ० | ००-४१-२ | --- | ००-४१-२ |
| ६० | १०१ | ० | ०१-६३-६ | --- | ०१-६३-६ |
| ६१ | १०२ | ० | ०३-०२-० | --- | ०३-०२-० |

**(संजय शं. जाधव)**
**अपर जिल्हाधिकारी तथा**
**मुख्य भूमि व भूमापन अधिकारी (भूसंपादन), सिडको**

**सिडको/जनसंपर्क/०६५/२०२५–२६**

# वाशीतील एपीएमसीत ड्रग्जचा बाजार

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**



**परराज्यातून आलेल्या मालाची खुलेआम होतेय विक्री**

शहरांप्रमाणेच वाशीतील बाजार समितीमध्येही अमली पदार्थांचे जाळे पसरलेले आहे. चरस, गांजा, अफिमसारखे अमली पदार्थ बाजारात अगदी सहज मिळतात. परराज्यातून आणि आयात मालाच्या माध्यमातून हे पदार्थ बाजारात येतात आणि इथल्या पानटपरीवर, काही ठराविक लोकांच्या अड्ड्यावर ते विकले जातात. याचाबत माथाडी नेत्यांनीच थेट आरोप केला असल्याने बाजारातील अमली पदार्थांच्या विक्रीचा विषय सध्या चर्चेत आला आहे. पावायत पोलिसांनी थेट कारवाई करावी, अशी मागणी यामुळे पुढे येऊ लागली आहे.

नवी मुंबईसारख्या आधुनिक शहराभोवती अमली पदार्थांचा विळखा वाढत चाललेला आहे. हे नुकत्याच पोलिसांनी केलेल्या कारवाईतूनही समोर आले आहे. ही अत्यंत चिंताजनक बाब आहे. यामधे तरुण पिढी मोठ्या प्रमाणात ओढली जात आहे. नवी मुंबईत मोठमोठ्या शैक्षणिक संस्था आहेत. त्यात शिक्षण घेणारी मुले या अमली पदार्थांच्या विळख्यात ओढली जात आहेत. हे पदार्थ शहरात येतात कसे, हा एक गंभीर विषय आहे. मात्र, परराज्यातून आणि आयात मालाच्या माध्यमातून हे अमली पदार्थ शहरात येत असल्याचा आरोप नुकताच माथाडी नेते नरेंद्र पाटील यांनी जाहीरपणे केला. त्यामुळे बाजार आवारातच नाही, तर पोलिस दलातही खळबळ उडाली आहे.

अमली पदार्थाविरोधात पोलिसांकडून अनेकदा कारवाया करून शहरात आलेले नशेचे पदार्थ, अमली पदार्थ ताब्यात घेतले जातात. नष्टही केले जातात, मात्र त्यांचा शहरांमध्ये होणारा पुरवठा नियमित कोणत्या ना कोणत्या मार्गाने सुरूच असतो. त्यामुळे ही समस्या आटोक्यात येण्याऐवजी दिवसोंदिवस वाढतच आहे.

मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये अमली पदार्थांचा प्रवेश कोणत्या ना कोणत्या मार्गाने होत असतोच. पोलिसांनी अनेकदा कारवाई करूनदेखील मालाच्या गाड्यांमधून हे चरस, गांजा, अफिमसारखे अमली पदार्थ बाजारात येतात. बाजार समितीच्या आवारात राज्यातून आणि देशातील कानाकोपऱ्यातून अगदी परदेशातूनही कृषी माल येतो. हा माल घेऊन येणारे चालक, क्लीनर आणि हाताखाली काम करणारी मुले यांच्या माध्यमातून अमली पदार्थ बाजारात येतात. शिवाय बाजाराच्या आवारात काम करणारे परप्रांतीय हमाल, बांगलादेशी कामगार, मजूर काही गुंड प्रवृत्तीचे लोक त्यांना त्यांच्या विक्रीसाठी मदत करतात. शिवाय बाजारातील पानटपऱ्यांवरही यांची विक्री होते.

बाजार समितीला, बाजार समितीच्या सुरक्षा विभागाला याचे काही सोयरसुतक नाही. त्यामुळे अमली पदार्थांचा बाजार सुरळीत सुरू असतो. पोलिसांनी कारवाई केली की त्या वेळेपर्यंत हे थांबते. मात्र, काहों दिवसांनंतर पुन्हा सर्व काही सुरळीत सुरू होते. परराज्यातून येणाऱ्या गाड्यांमधून हे अमली पदार्थ अगदी सहज मालाच्या गाडीबरोबर इकडे येतात आणि शहरात पुरवले जातात. पुडी आणि तोळा पा हिशेबाने हे विकले जातात. गांजाची एक पुडी ६०० १०० रुपये, तर चरस ६०० ते ७०० तोळा रुपये या दराने विकला जातो. हे विकत घेणारी ग्राहक ठरलेली असतात आणि ग्राहकांच्या माध्यमातून नवीन ग्राहक जोडले जातात. या आमली पदार्थ विकणाऱ्या आणि सेवन करणाऱ्यांमुळे बाजार समितीच्या आवारात गुंड प्रवृत्तीचे लोक वाढायला लागले आहेत. त्यामुळे हे अमली पदार्थांचे जाळे तोडण्याची मागणी जागरूक व्यापारी करत आहेत.

> गांजा, चरस घेणारे अनेकदा पोलिसांच्या हाती लागतात, मात्र पोलिसांनी पकडून नेल्यावर ते नशेत पोलीस ठाण्यात तमाशा करतात, स्वतःला जखमी करून घेतात. त्यामुळे पोलिसांना हा ताप सहन करावा लागतो. बाजार समितीत खुलेआम आयात मालाच्या माध्यमातून अमली पदार्थ घेतात. त्यामुळे याची सखोल चौकशी व्हायला पाहिजे. हे प्रकार थांबायला पाहिजेत.
>
> **–नरेंद्र पाटील**, माथाडी नेते

> शुक्रवारी एपीएमसी पोलीस, गुन्हे शाखा आणि परिमंडळ १च्या संयुक्त पथकाने मोठी तपास मोहीम राबवून १५० संशयितांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडील नागरिकत्वाच्या कागदपत्रांची तपासणी सुरू आहे. या तपास मोहिमे अंतर्गत एपीएमसी बाजारातील आठ कोल्ड स्टोरेज, गोदामे, संपूर्ण बाजार आवार पिंजून काढला आहे.
>
> **–अजय शिंदे**, वरिष्ठ पोलीस निरीक्षक

# प्रकटीकरण होण्यासाठी प्रत्येकाने लिहिते झाले पाहिजे -ए.के.शेख

**पनवेल : वार्ताहर**

भावभावनांचा कल्लोळ प्रत्येकाच्या मनात असतो. त्याला शब्दरूप मिळून त्याचे प्रकटीकरण होण्यासाठी प्रत्येकाने लिहिते झाले पाहिजे. असे भावपूर्ण उद्गार ज्येष्ठ गजल- कार ए.के.शेख यांनी काढले. येथील के. गो.लिमये सार्वजनिक वाचनालय व ग्रंथालय आणि कोकण मराठी साहित्य परिषद- शाखा पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित वाचनालयाच्या सभागृहात झालेल्या पुस्तक प्रकाशन सोहळ्यात ते बोलत होते.



ते पुढे म्हणाले, पनवेल नगरी लेखकनगरी होत आहे ही चांगली गोष्ट आहे. काशिनाथ जाधव यांनी 'भारत देशाचे महान नेते'या पुस्तकात १९नेत्यांचा परिचय करून दिला आहे. त्यातील १५ नेते भारतरत्न पुरस्कारांनी सन्मानित आहेत. आपल्याला नेत्यांची केवळ नावे माहीत असतात, पण त्यांच्याबद्दल फारच थोडी माहिती असते. देशातील महान नेत्यांच्या माहितीची गरज हे सुंदर पुस्तक भरून काढते. त्या दृष्टीने काशिनाथ जाधव यांनी फार मोठे कार्य केले आहे.त्यांची साहित्यिक म्हणून वाटचाल आता सुरू झाली आहे. त्यांच्या पुस्तकाचे प्रकाशन झाले, असे मी जाहीर करतो.

ॲड.सुनीता जोशी लिखित 'माझ्या जन्माची गोष्ट' या कादंबरीचे प्रकाशन जनसंवादिनी ठाणे संस्थेचे संस्थापक, व्याख्याते व प्रशिक्षक योगेशचंद्र लोहकरे यांच्या हस्ते झाले. प्रकाशन प्रसंगी ते म्हणाले, ॲड. सुनीता जोशी यांनी विविध प्रकारचे लेखन केले असून त्या संवेदनशील लेखिका आहेत. त्यांनी नाट्यछटा लिहिल्या, पण त्या नाटकी नाहीत. अनेक साहित्य संमेलनात त्यांचा सहभाग असतो. या कादंबरीत बंडखोरी नाही,त्यामुळे हे दलित साहित्य प्रकारात मोडत नाही, मात्र प्रत्येक जाती- जमातीचे किमान एक तरी पुस्तक प्रसिद्ध होईल, तेव्हा आपणास त्यांच्या असहाय्यतेची, उद्रेकाची व संघर्षाची माहिती होईल. तसेच विस्थापितांचे व दंगलपीडितांचेआक्रंदन लेखकांनी समाजापुढे आणावे. कृत्रिम बुद्धिमत्तेविषयी बोलताना ते म्हणाले, कृत्रिम बुद्धिमत्तेला संवेदनशीलता नसते, पण त्यातील तांत्रिक बाबींचा आवश्यकतेनुसार उपयोग करून घ्यावा. मराठी भाषेला अभिजीत भाषेचा दर्जा प्राचीनता, मौलिकता, सातत्य, संस्कृतिक वारसा इत्यादी निकषांद्वारे प्राप्त झाल्याची माहिती त्यांनी दिली.

वाचनालयाचे सभागृह अनेक मान्यवर रसिक श्रोत्यांनी भरून गेले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲड. माधुरी थळकर यांनी ओघवत्या भाषेत केले. लेखक -द्वयीनी पुस्तक लेखनाविषयी आपल्या भूमिका विशद केल्या. ए.के. शेख यांचा परिचय राजकुमार ताकमोगे यांनी, तर योगेशचंद्र लोहकरे यांचा परिचय विशाल पवार यांनी करून दिला. मुद्रक प्रशांत चातुर्य यांना यथोचित सन्मानित करण्यात आले. वाचलेली पुस्तके व भेटलेली माणसे आयुष्य घडवतात. अशी समर्पक सुरुवात करून कार्यक्रमाचे अध्यक्ष रोहिदास पोटे यांनी लेखक हा संवेदनशील माणूस असतो. तो तादात्म्य, एकरूपता व परकाया प्रवेशाच्या सहाय्याने लेखन कृतीची निर्मिती करतो, असे प्रतिपादन केले.

को.म.सा.प. पनवेल शाखेचे सहसचिव राजकुमार ताकमोगे यांच्या आभार प्रदर्शनाने या सुरेख साहित्यिक कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी के.गो.लिमये वाचनालयाच्या ग्रंथपाल निकिता शिंदे, सहाय्यक ग्रंथपाल संपदा जोशी, लिपिक हर्षिता तुरकर व सेवक संजय दिवटे यांनी विशेष परिश्रम घेतले.

## पोलीस उपायुक्तांच्या गाडीला अपघात

**पनवेल : वार्ताहर**

नवी मुंबई पोलीस आयुक्तालय परिमंडळ-२ चे पोलीस उपायुक्त प्रशांत मोहिते यांच्या इनोव्हा कारला भरधाव असेंट कारने धडक दिल्याची घटना कळंबोली सर्कल जवळ पडली. या अपघातात कुणालाही दुखापत झाली नसली तरी, पोलीस उपायुक्तांच्या इनोव्हा कारचे नुकसान झाले आहे. या अपघातानंतर खांदेश्वर पोलिसांनी धडक देणाऱ्या कार चालकाचा शोध घेऊन त्याला ताब्यात घेतले आहे.

परिमंडळ-२ चे पोलीस उपायुक्त प्रशांत मोहिते सीबीडी-बेलापूर येथील पोलीस आयुक्तालयात बैठकीसाठी गेले होते. दुपारी १ वाजण्याच्या सुमारास बैठक संपल्यानंतर ते आपल्या सरकारी इनोव्हा कारने पनवेल येथील कार्यालयात परतत होते. यावेळी कळंबोली सर्कल येथून पनवेलच्या दिशेने जात असताना इंडीयन ऑईल पेट्रोलपंपासमोर असेंट कार चालकाने भरधाव वेगाने कार चालवून नेत मोहिते यांच्या इनोव्हा कारला ओव्हरटेक करण्याचा प्रयत्न केला. यावेळी असेंट कारची पोलीस उपायुक्तांच्या इनोव्हा कारला जोरदार धडक लागली. सुदैवाने या अपघातात कुणीही जखमी झाले नाही, मात्र इनोव्हा कारच्या पुढील बंपरचे नुकसान झाले आहे.

या अपघातानंतर खांदेश्वर पोलिसांनी पळून गेलेल्या असेंट कार चालकाविरोधात गुन्हा दाखल केला. त्यानंतर पोलिसांनी त्याचा शोध घेऊन त्याला ताब्यात घेतले. तसेच त्याला नोटीस बजावून त्याची सुटका केली.

# करंजाडे शहरात शिवसेनेतर्फे शहीद जवानांना श्रद्धांजली

**पनवेल : वार्ताहर**

करंजाडे शहरामध्ये शिवसेना करंजाडे शहर विभागातर्फे देशासाठी शहीद झालेल्या जवानांना अत्यंत श्रद्धेने आणि कृतज्ञतेने श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

या कार्यक्रमाचे आयोजन शिवसेना करंजाडेच्या वतीने करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराज चौक सेक्टर ५, करंजाडे, या वेळी शिवसेना उपजिल्हाप्रमुख विनोद साबळे, उरण विधानसभा सचिव हितेश नाईक, तालुका संपर्क प्रमुख बाळाराम नाईक, करंजाडे विभागप्रमुख नाथाभाई भरवाड, शहर संपर्क प्रमुख चंद्रकांत गुजर, शहरप्रमुख मिरेंद्र शहारे, शहर संघटक स्वप्नील मोरे, महिला शहरप्रमुख अंजु सिंह, पंचायत समिती प्रमुख बाळासाहेब अवारी, उपशहरप्रमुख वसंत सोनवणे, प्रल्हाद कुंभार, अक्षय टिके, अजित कदम, शहर सचिव सचिन कदम, शाखाप्रमुख दिनेश धामनस्कर, राजाभाऊ नलावडे, नितीन कुंभार, ज्वलासिंह देशमुख, जयेश पटेल, गणेश वालझाडे,



जयराज गणिगा, विश्वनाथ शेट्टी, संचित मोरे, संदीप पारठे, तुलसी गौतम, लीलाधर म्हात्रे, अरुण कंबीरे, कार्यकर्ते, पदाधिकारी, स्थानिक नागरिक आणि तरुण वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी उपस्थित सर्वांनी दोन मिनिटांचे मौन पाळून शहीदांच्या बलिदानास अभिवादन केले. उपास्थितांनी हातात तिरंगा घेऊन 'भारत माता की जय' आणि 'जय जवान, जय हिंद' अशा घोषणांनी परिसर दुमदुमवून टाकला. कार्यक्रमाच्या शेवटी 'वंदे मातरम्'च्या घोषात श्रद्धांजली समारंभ समाप्त झाला. या कार्यक्रमातून करंजाडे शहरातील नागरिकांनी देशप्रेमाची आणि शहीदांविषयी कृतज्ञतेची जाणीव प्रकट केली.

# नवी मुंबईच्या खाडी किनाऱ्यांवर फ्लेमिंगोंची गर्दी

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

पांढऱ्या शुभ्र रंगाचे, गुलाबी पंखांचे, बाकदार चोच आणि लांब पाय अशा सुंदर वर्णनाचे अग्निपंख असणाऱ्या फ्लेमिंगो (रोहित) पक्ष्यांनी सध्या नवी मुंबईकरांना भुरळ पाडली आहे. नवी मुंबईचे खाडी किनारे परदेशी पक्ष्यांनी फुलून गेले असल्याने शहराच्या सभोवताली गुलाबी रंगाची झालर निर्माण झाली आहे. या पक्ष्यांना पाहण्यासाठी नागरिक खाडी किनाऱ्यांवर गर्दी करत असून पक्षी अभ्यासकांसाठीही पर्वणी ठरत आहेत.



मूळच्या आखाती देशातून येणारा हा पक्षी लाखो मैल प्रवास करून नवी मुंबईच्या खाडी-किनारी स्थिरावला आहे. हिवाळा सुरू होण्यापूर्वीच ऑक्टोबर महिन्यापासून रोहित पक्षी खाडी किनारी येण्यास सुरुवात होते. सहा ते सात महिने मुक्काम केल्यानंतर हे पक्षी आता परतीच्या प्रवासाकडे निघणार आहेत. मात्र, त्यांची दरवर्षी वाढत जाणारी संख्या सर्वांनाच आश्चर्याचा धक्का देणारी आहे. फ्लेमिंगोंचे मुख्य खाद्य असलेले शेवाळ इथल्या उष्ण वातावरणात चांगले वाढते. अन्नाच्या शोधात भटकणाऱ्या या पक्ष्यांना इथे मुबलक अन्न उपलब्ध होत असल्याने त्यांची संख्या सातत्याने वाढत असल्याचे पक्षी निरीक्षक सांगतात. सीबीडी-बेलापूरच्या एनआरआय कॉलनी मागील खाडी किनारी, डीपीएस शाळा तलाव, टीएच चाणक्य मरिन अकादमीच्या पाठीमागील बाजूस, नेरूळ खाडी, वाशी, कोपरखैरणे, घणसोली, ऐरोली, मुलुंड खाडीपर्यंत असलेल्या कांदळवनांमध्ये या पक्ष्यांनी संसार थाटले आहेत.

फ्लेमिंगो पक्षी पाहण्यासाठी नवी मुंबई महापालिकेने काही खाडी किनारी विव्हिंग गॅलरी उभारलेल्या आहेत. या गॅरलीतील उंचीवरून रोहित पक्ष्यांचे विहंगम दृश्य दिसते. पक्षी निरीक्षणासाठी सोयीचे असल्याने नागरिकांकडून पसंती मिळत आहे.

### परदेशातून पक्ष्यांचे स्थलांतर

***युरोप, आफ्रिका, आशियात आढळणारा कॉमन रेडशान्क (सामान्य टीलवा), आयर्लंड येथे आढळणारा ब्लॅक टाईल्ड गॉडविट (शेपटीचा पाणटीळवा), इंग्लंड व युरोपियन देशांत आढळणारा युरेशियन कुरव, युरोप, मध्य व पश्चिम आशिया, आफ्रिका व दक्षिण आशिया दिसणारा पेड एव्होसेट (उचाट्या), अंटार्टिका सोडून सर्व खंडांमध्ये सामान्यपणे आढळणारा व घारीप्रमाणे दिसणारा ओसप्रे (कैकर), उत्तर युरोप, उत्तर अमेरिका, आशियामध्ये दिसणारा नॉर्थ शॉवेलर (थापट्या) आदी प्रवासी पक्षी नवी मुंबईतील खाडी किनाऱ्यांवर येण्यास सुरुवात झाली आहे.***

## हेदोरावाडी पाडामधील बोअरवेल दोन वर्षांनी सुरू

**पनवेल : वार्ताहर**


खारघरमधील हेदोरावाडी आदिवासी पाड्यातील बंद अवस्थेत असलेली बोअरवेल दोन वर्षांनी सुरु झाल्यामुळे हेदोरावाडी ग्रामस्थ समाधान व्यक्त करीत आहेत.



खारघर परिसरात गेल्या अनेक दिवसांपासून कमी दाबाने पाणी पुरवठा होत असल्यामुळे रहिवाशांना वॉटर टँकर मागवून पाणी विकत घ्यावे लागत आहे. दरम्यान, खारघर सेक्टर-५ मध्ये डोंगर पायथ्याशी असलेल्या हेदोरावाडी आदिवासी पाड्यात पाणी टंचाई असल्यामुळे याबाबत अनेकांनी पनवेल महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागाकडे त्यांची बाजू मांडली. अखेरीस पाणी पुरवठा विभागाने हेदोरावाडी आदिवासी पाड्यातील गेल्या दोन वर्षांपासून बंद असलेली बोअरवेल सुरू केली आहे तसेच सिडकोकडून पाणी पुरवठा उपलब्ध केला जात असल्यामुळे हेदोरावाडी ग्रामस्थ समाधान व्यक्त करीत आहेत. हेदोरावाडी आदिवासी पाड्यातील बोअरवेल गेल्या दोन वर्षांपासून बंद पडली होती. याशिवाय सिडकोकडून पुरेसे पाणी उपलब्ध होत नसल्यामुळे हेदोरावाडी आदिवासी पाड्यातील रहिवाशांना विशेषतः महिलांना हेदोरावाडी आदिवासी पाडा शेजारील हौसिंग सोसायटी तसेच खाजगी समाज मंदिर ट्रस्ट यांच्याकडून पाणी घेवून पाण्याची गरज पूर्ण करावी लागत होती.

पनवेल महापालिकेच्या पाणी पुरवठा विभागाने हेदोरावाडी मधील बोअरवेल दुरुस्ती केली आहे. याशिवाय हेदोरावाडी मध्ये सिडकोकडून पाणी उपलब्ध होत आहे. दरम्यान, हेदोरावाडी आदिवासी पाड्यालगत भूमिगत असलेल्या पाणी टांकाची बंद असलेली मोटार लवकरच दुरुस्त करण्यात येणार आहे, असे पनवेल महापालिका पाणीपुरवठा विभागातील अधिकाऱ्यांनी सांगितले.

**क्लिक...क्लिक...!**



**मुरूड : शनिवार रविवारच्या सुट्टीनिमित्ताने अनेक पर्यटक समुद्रकिनारी आलेले आहेत. सायंकाळच्या सूर्यास्ताचे औचित्य साधत अनेक पर्यटकांनी समुद्र स्नान करून आनंद लुटला.** (छाया : संजय करडे)

## फळांची आवक वाढली; किमती कमीच

**नवी मुंबई : बातमीदार**

हवामान बदलत असले तरी आरोग्याच्या दृष्टीने उपयुक्त असलेल्या फळांना सध्या बाजारात विशेष मागणी आहे. त्यातही कलिंगड, पपई आणि टरबूज या फळांना मोठी मागणी आहे. त्यामुळे मुंबईच्या घाऊक बाजारात सध्या या तिन्ही फळांच्या प्रत्येकी ५० गाड्या दररोज बाजारात येत आहेत.

उन्हाळ्यात जागोजागी फळांचे रस, फळांचे सॅलड यांच्या गाड्या लागलेल्या दिसतात. घरी खाण्यासाठीही लोक फळांची खरेदी आवर्जून करतात. त्यामुळे सध्या बाजारात फळांना मागणी वाढली आहे. मात्र, तरीही फळांच्या किमती स्थिर आहेत. बाजारात फळांना चांगला दर मिळत नसल्याचे व्यापारी सांगत आहेत. फळे नाशिवंत असल्याने उन्हाळ्यात ती लवकर खराब होतात. त्यामुळे ती जास्त वेळ साठवून फळे ठेवता येत नाहीत. परिणामी मिळेल त्या किमतीत ती विकावी लागत असल्याने, फळांच्या किमती कमीच आहेत, अशी माहिती व्यापारी शिवजीराव चव्हाण यांनी दिली आहे. एरव्ही या फळांच्या १० ते १५ गाड्या दररोज बाजारात येत असतात, मात्र आता प्रत्येक फळाच्या ५० गाड्यांची आवक होत आहे. महिनाभर ही आवक अशीच राहणार असल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले.

# आयपीएलच्या अंतिम सामन्याची तारीख ठरली!

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारत आणि पाकिस्तानातील तणावाची स्थिती पाहता आयपीएल २०२५ स्पर्धा एक आठवड्यासाठी स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. या स्पर्धेतील फायनलचा सामना २५ मे रोजी होणार होता, मात्र आता बीसीसीआय ही स्पर्धा आणखी पुढे खेचणार असल्याचं म्हटलं जात आहे. इंडियन एक्स्प्रेसने दिलेल्या वृत्तानुसार स्पर्धेतील फायनलचा सामना ३० मे रोजी खेळवला जाऊ शकतो. या स्पर्धेतील उर्वरीत सामन्यांना १६ मे पासून सुरूवात होणार असल्याचे म्हटले जात आहे. तर या स्पर्धे तील सामने चेन्नई, बंगळुरू आणि हैदराबादमध्ये खेळवले जाणार आहेत.



आयपीएल २०२५ स्पर्धेतील एकूण ७४ सामने खेळवले जाणार आहेत. त्यापैकी ५८ सामने पूर्ण झाले आहेत. तर १६ सामने अजूनही शिल्लक आहेत. ज्यात प्लेऑफच्या सामन्यांसह फायनलचा देखील समावेश आहे. इंडियन एक्स्प्रेसच्या वृत्तानुसार, या स्पर्धेचे सुधारीत वेळापत्रक आज संध्याकाळपर्यंत जाहीर केले जाऊ शकते. त्यामुळे आयपीएल स्थगित झाल्यानंतर मायदेशी परतलेल्या खेळाडूंच्या उपलब्धतेबद्दल आता चिंता व्यक्त केली जाऊ लागली आहे.

बीसीसीआयच्या एका सुत्राने माहिती देताना म्हटले की, आयपीएल स्पर्धा एक आठवड्यासाठी स्थगित करण्यात आल्याने, आयपीएलचा फायनलचा सामना आता २५ ऐवजी ३० मे रोजी खेळवला जाऊ शकतो. ही स्पर्धा आता मर्यादीत ठिकाणी खेळवली जाऊ शकते. आज रात्रीपर्यंत सर्व संघांना वेळापत्रक पाठवले जाईल.

बीसीसीआयने पंजाब किंग्ज संघाला वगळता इतर सर्व संघातील खेळाडूंना येत्या मंगळवारपर्यंत आपापल्या ठिकाणी हजर राहण्यासाठी सांगितलं आहे. कारण शुक्रवारपर्यंत आयपीएल स्पर्धा पुन्हा एकदा सुरू केली जाऊ शकते. काही संघातील खेळाडू आणि सपोर्ट स्टाफमधील सदस्य मायदेशी परतले आहेत. आता त्या खेळाडूंना पुन्हा बोलवण्याचे आदेश बीसीसीआयने फ्रँचायझींनी दिले असल्याचे म्हटले जात आहे.

गुरूवारी पंजाब किंग्ज आणि दिल्ली कॅपिटल्स सामन्यातील पहिल्या डावातील १० षटकं झाल्यानंतर बीसीसीआयने हा सामना रद्द करण्याचा निर्णय घेतला होता. आधी स्टेडियमच्या लाईट्स बंद करण्यात आल्या. त्यानंतर प्रेक्षकांना मैदानाबाहेर पाठवण्यात आलं आणि हा सामना रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला. शेवटी ही स्पर्धा एक आठवड्यासाठी स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे खेळाडू आपल्या मायदेशी परतले आहेत. आता परदेशात गेलेल्या खेळाडूंना परत आणण्याचं मोठं आव्हान बीसीसीआय आणि फ्रँचायझींसमोर असणार आहे.

# आज प्रीमियर लीग स्पर्धेचे उद्घाटन

**अलिबाग, पेण : प्रतिनिधी**

प्रीमियर लीग स्पर्धेचे सोमवारी (दि.१२) उद्घाटन मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे. दरम्यान, महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनचे (एमसीए) अध्यक्ष आमदार रोहित पवार सोमवारी रायगड जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. या दौऱ्यात ते रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या कामाचा आढावा घेणार आहे. प्रीमियर लीग स्पर्धेच्या उद्घाटन कार्यक्रमास उपस्थित राहणार आहेत.

दुपारी १२.३० वाजता पेण येथील छत्रपती शिवाजी महाराज मैदानावर एमसीए आयोजित सोळा वर्षाखालील आंतरजिल्हा क्रिकेट सामन्याला भेट देतील. त्यानंतर दुपारी २.३० वाजता शरद पवार भवन पेण नगरपरिषद हॉल येथे महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या



वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या महाराष्ट्र प्रीमियर लीग व महाराष्ट्र वुमेन्स प्रीमियर लीग स्पर्धेविषयी पत्रकार परिषद घेण्यात येणार आहे.

दुपारी ३.३० वाजता उलवे येथील रामशेठ ठाकूर क्रिकेट मैदान शिवाजीनगर येथे रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशन प्रीमियर लीग टी-२० क्रिकेट स्पर्धेच्या उद्घाटन कार्यक्रमासाठी उपस्थित राहणार आहेत. लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार रवीशेठ पाटील, आमदार महेश बालदी, आमदार महेंद्र दळवी, आमदार विक्रांत पाटील, कामगार नेते महेंद्र घरत, माजी आमदार अनिकेत तटकरे, पनवेल महानगरपालिकेचे गटनेते परेश ठाकूर, पेण नगरपालिकेचे माजी नगराध्यक्ष प्रीतम पाटील व सिडकोचे संचालक गणेश देशमुख आदी या वेळी उपस्थित राहणार आहेत.

कार्यक्रमासाठी रायगड जिल्ह्यातील सर्व अकॅडमी क्लबच्या क्रिकेट खेळाडू,पंच, प्रशिक्षक व क्रिकेट प्रेमी लोकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील सचिव प्रदिप नाईक यांनी केले आहे.

# वेटलिफ्टिंगमध्ये आकांक्षाला ‘सुवर्ण’, वेदिकाला ‘कांस्य’



**गया (बिहार) : वृत्तसंस्था**

नाशिकच्या मनमाडमधील व्यवहारे कुटुंबियांनी खेलो इंडिया युवा स्पर्धेत सुवर्णपदक जिंकण्याची परंपरा बिहारमध्येही कायम राखली. सातव्या खेलो इंडिया युवा स्पर्धेत आकांक्षा व्यवहारेने ४५ किलो गटात सुवर्ण, तर ठाणेच्या वेदिका टोळेने कांस्यपदकाला गवसणी घातली.

राजगीर क्रीडा विद्यापीठाच्या परिसरात सुरू असलेल्या वेटलिफ्टिंग खेळातही पहिल्या दिवसापासून महाराष्ट्राचा डंका पहाण्यास मिळाला. ४५ किलो गटात नऊपैकी तीन स्पर्धेक महाराष्ट्राचे होते. अपेक्षेप्रमाणे आकांक्षाने एकूण १४८ किलो वजन उचलून सोनेरी यश पटकावले. १२७ किलो वजनाची कामगिरी करीत वेदिका टोळेने तिसरे स्थान प्राप्त केले. आकांक्षाचे हे खेलो इंडिया स्पर्धे तील दुसरे पदक आहे. मध्य प्रदेशातील २०२३ स्पर्धेत तीने सुवर्णपदक जिंकले होते. गत स्पर्धे त दुखापतीमुळे चौथ्या स्थानावर तीची कामगिरी होती. बिहार स्पर्धे त दुखापतीवर मात करून तीने पदकाचा करिश्मा घडविला

स्नॅच प्रकारात अपेक्षेप्रमाणे आकांक्षाने दमदार सुरुवात केली. तिसऱ्या प्रयत्नात सर्वाधिक ६८ किलो वजन उचलून आकांक्षाने आपले वर्चस्व गाजवले. पाठोपाठ क्लिन अँन्ड जर्क प्रकारातही सर्वाधिक ८० किलो वजन उचलून आकांक्षाने सुवर्णपदकावर नाव कोरले. वेदिकाने स्नॅच प्रकारात ६० किलोची कामगिरी करीत दुसरे स्थान मिळवले होते. क्लिन अँन्ड जर्क प्रकारात ७० गुणांसह ती मागे पडली. केवळ एक गुणाने तिचे रौप्यपदक हुकले. पंजाबच्या लव्हजोत कौरने १२८ गुण संपादून रौप्यपदकाचे यश संपादन केले.

नाशिकच्या जय भवानी व्यायाम शाळेत सराव करणारी आकांक्षा पाच आंतरराष्ट्रीय स्पर्धा खेळल्या आहे. तीने १९ वर्षांखालील गटात राष्ट्रकुल स्पर्धे त पदक जिंकले आहे. प्रवीण व्यवहारे यांच्या मार्गदर्शनाखाली ती सराव करते. गतवर्षी आकांक्षाचा भाऊ कृष्णाने सुवर्णपदक पटकावले होते.


वेदिका टोळे हिचे आई वडील हे दोघेही वेटलिफ्टर खेळाडू आहेत. सांगलीच्या राष्ट्रीय पदक विजेत्या खेळाडू असलेल्या मधुरा सिंहासने यांची ती मुलगी आहे. आवड व सुदृढतेसाठी मी वेटलिफ्टिंग खेळते. खेलो इंडियातील हे पदक माझ्यासाठी बोनस असल्याचे वेदिकाने सांगितले.

# ऑस्ट्रेलियाचे दिग्गज खेळाडू बॉब काउपर यांचे निधन

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

ऑस्ट्रेलियाचे माजी क्रिकेटपटू बॉब काउपर यांचे निधन झाले आहे. वयाच्या २८ व्या वर्षी ऑस्ट्रेलियन क्रिकेटला रामराम करणाऱ्या बॉब काउपर यांनी वयाच्या ८४व्या वर्षी अखेरचा श्वास घेतला. क्रिकेट ऑस्ट्रेलियाने पोस्ट शेअर करून काउपर यांच्या निधनाची बातमी दिली. काउपर यांचे कर्करोगामुळे निधन झाले आहे. त्यांच्या निधनानंतर क्रिकेटविश्वात शोककळा पसरली आहे.

क्रिकेट ऑस्ट्रेलियाने पोस्ट शेअर करून लिहिले की, आज क्रिकेट ऑस्ट्रेलिया बॉब काउपर यांच्या निधनावर शोक व्यक्त करत आहे. बॉबबद्दल बोलायचे झाले, तर ते डावखुऱ्या हाताचे उत्कृष्ट फलंदाज होते. त्यांनी ऑस्ट्रेलियासाठी कसोटी क्रिकेटमध्ये ५ शतकं झळकावली. ज्यात १९६६ मध्ये झालेल्या अ‍ॅशेल मालिकेतील त्रिशतकी खेळीचाही समावेश आहे. बॉब यांच्या कुटुंबीय, मित्र आणि सहकाऱ्यांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत. बॉब काउपर यांनी इंग्लंडविरूद्ध



झालेल्या सामन्यात १२ तास फलंदाजी करून इंग्लंडच्या गोलंदाजांना चांगलाच घाम फोडला होता. यासह ते ऑस्ट्रेलियात खेळताना त्रिशतकी खेळी करणारे पहिले फलंदाज ठरले होते.

काउपर यांच्या निधनानंतर क्रिकेटविश्वात शोककळा पसरली आहे. अनेक दिग्गज खेळाडूंनी त्यांच्या निधनानंतर श्रद्धांजली वाहिली आहे. काउपर हे गेल्या ६ महिन्यांत जगाचा निरोप घेणारे १९७० च्या दशकातील तिसरे क्रिकेटपटू आहेत. गेल्या ६ महिन्यात ऑस्ट्रेलियाच्या ३ दिग्गज खेळाडूंचे निधन झाले आहे. गेल्या वर्षी इयान रेडपाथ यांचे वयाच्या ८३ व्या वर्षी निधन झाले होते. तर किश स्टेकपॉल यांचे वयाच्या ८४ व्या वर्षी निधन झाले होते.


# जलतरणात मुलांमध्ये महाराष्ट्राला उपविजेतेपद

## मुलींच्या विभागात महाराष्ट्र-कर्नाटक संयुक्त विजेते

**गया (बिहार) : वृत्तसंस्था**

महाराष्ट्राच्या जलतरणपटूंनी सातव्या खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेत सात सुवर्ण, सात रौप्य व १५ कांस्य अशी एकूण २९ पदकांची लयलूट करीत सर्वसाधारण उपविजेतेपद पटकाविले. मुलींच्या विभागात महाराष्ट्र-कर्नाटक संयुक्त विजेतेपद संपादन केले. त्यांनी प्रत्येकी एक सुवर्ण, दोन रौप्य व तीन कांस्य अशी एकूण सहा पदके जिंकली. चार सुवर्ण, एक रौप्यांनतर अखेरच्या दिवशी कांस्य यशाने आदिती हेडगेने पदकांचा षटकार झळकविला.

बिपार्ड जलतरण तलावावर संपलेल्या जलतरणात मुलांच्या विभागात कर्नाटकने १३६ गुणांसह विजेतेपद पटकाविले, तर महाराष्ट्राने ६५ गुणांसह उपविजेपद मिळवले. आंध्र प्रदेश संघाने ६४ गुणांसह तिसरा क्रमांक प्राप्त केला. मुलींच्या विभागात महाराष्ट्र व कर्नाटक यांनी प्रत्येकी १५६ गुणांची कमाई केली. या गटातील विजेतेपद उभय संघांना विभागून देण्यात आले. तमिळनाडूच्या मुलींनी ६० गुणांसह



उपविजेपदाचा मान मिळविला

शनाया शेट्टी हिने ३४.६७ सेकंद वेळेसह महाराष्ट्राला अखेरच्या दिवसातील एकमेव सुवर्णपदक जिंकून दिले. या गटात कर्नाटकची मानवी वर्मा (३५.२३ सेकंद) व तिचीच राज्य सहकारी विहिथा लोगनाथन (३५.४८ सेकंद) या अनुक्रमे रौप्य व कांस्यपदकाच्या मानकरी ठरल्या.

मुलांच्या २०० मीटर फ्रिस्टाईल प्रकारात महाराष्ट्राला दोन पदके मिळाली. धरीती अहिरराव हिने २ मिनिटे ३३.१४ सेकंद वेळेसह रौप्य व निर्मयी आंबेटकर हिने २ मिनिटे २५.२१ सेकंद वेळेसह कांस्यपदक जिंकले. तमिळनाडूच्या रोशिनी बाळसुब्रमनियन हिने २ मिनिटे २२.९७ सेकंद वेळेसह सुवर्णपदकाची कमाई केली.

मुलींच्या ५० मीटर फ्रिस्टाईल प्रकारात श्रीलेखा पारीक (२७.३९ सेकंद) व अल्फेया धनसुरा (२७.४१ सेकंद) यांनी अनुक्रमे रौप्य व कांस्यपदकाची कमाई केली. कर्नाटकच्या ऋजुला एस हिने २७.१२ सेकंद वेळेसह सुवर्णपदकावर नाव कोरले. शिवाय मुलींच्या १५०० मीटर फ्रिस्टाईल प्रकारात महाराष्ट्राच्या आदिती हेगडे हिने १८ मिनिट २२.९७ सेकंद वेळेसह कांस्यपदकाची कमाई केली. आदिती मुळे (१८ मिनिटे ०४.३९) व श्री चरणी तमू (१८ मिनिटे १९.२९ सेकंद) या कर्नाटकच्या जलतरणपटूंनी अनुक्रमे सुवर्ण व रौप्यपदकाला गवसणी घातली.












दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com